म

| विषय | लेखक ... |
|---|---|
| निबंध | रा... भागवत |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचे [नाव] महाराष्ट्र धर्म |
| ९३ / ५८९ | |

१८९५

९३
सं.क्र. ५८९

# महाराष्ट्र धर्म.

निबंध

# महाराष्ट्र धर्म.

हा निबंध लिहिणार,

## राजाराम रामकृष्ण भागवत.

"ब्राह्मण" छापखान्यांत छापला.

कार्तिक शुद्ध १३ शके १८१७

किंमत आणे ५, टपाल खर्च आणा १.

ही लहानशी माळ

सं. नि. ३८

मराठी भाषेची आणि मराठी लोकांची खरी कळकळ बाळगणारे

रबान एच्. ए. आक्वर्थसाहेब बहादुर

( रजेवर गेलेले मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर )

यांचे पायीं

परवानगी घेऊन

एका मराठ्यानें

कृतज्ञपणानें वाहिली असे.

कार्तिक शु० १३ शके १८१७

नि. ४८
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. १४
ठाणे सन १८७
सं. नि. ३४

# महाराष्ट्र धर्म.

## प्रस्तावना.

"मराठी" किंवा "मराठा" हा शब्द संस्कृत भाषेंत "महाराष्ट्र" लिहिण्याची वहिवाट आहे. या वहिवाटीस अनुसरून "मराठी" मंडळाच्या ऐवजीं "महाराष्ट्र मंडळ", "मराठी भाषे"च्या ऐवजीं "महाराष्ट्र भाषा" आणि "मराठी धर्मा"-च्या ऐवजीं "महाराष्ट्र धर्म" असा प्रयोग पुष्कळ स्थळीं करण्यांत येतो. मंडळ, भाषा आणि धर्म या त्रिवर्गाचा एकमेकाशीं जरी अति निकट संबंध आहे, तरी आज विशेष प्रसंग मराठी मंडळाशीं किंवा मराठी भाषेशीं नाहीं, तर मराठी धर्माशीं आहे. साल तिगस्त रामदासनवमीच्या प्रीत्यर्थ शेणव्यांच्या ठाकुरद्वारीं मुलांचा मेळा भरला होता त्या प्रसंगीं रामदासाच्या चरित्रांतील कित्येक गोष्टींचें समर्थन करीत असतां रावबहादुर रानड्यांकडून "महाराष्ट्र धर्म वाढवावा" ही रामदासी ओंवी दाखल करण्यांत आली आणि जमलेल्या मंडळीपैकीं एखाद्याकडून जर "महाराष्ट्र धर्मा"चें स्वरूप लोकांस कळेल तर ठीक होईल अशा अर्थाचा उद्गारही काढण्यांत आला. रावबहादुर रानड्यांसारख्या वृद्धांचा उद्गार हा जे त्यांच्या सारखे वृद्ध नसतील त्यांस आज्ञेच्या स्थानीं समजणाऱ्या एका कडून "महाराष्ट्र धर्मा"ची कथा आज आपणांस ऐकवण्यांत येत आहे. या कथेंत टाकून देण्याजोगा भाग असेल तो टाकून देऊन, घेण्याजोगा भाग असेल तो घेण्यास आपण मुखत्यार आहां.

## पूर्वार्ध.

### १ महाराष्ट्र धर्माचा पाया.

कलियुगाचे आरंभीं कौरव आणि पांडव यांच्यामध्यें भयंकर तंटा लागला. या तंट्यास सुरवात होण्याचे पूर्वी आजोबा भीष्म गुरुजी द्रोण वगैरे वडील माणसें आणि दुर्योधनासारखे चुलत भाऊ आपला जीव घेण्यास कंबर बांधलेले पाहून अर्जुनाचें हृदय थोडें द्रवलें. वडील माणसांस आणि अगदीं जवळच्या नातलगांस तलवारीच्या तोंडीं बळी देऊन ऐश्वर्य भोगण्यापेक्षां आंगास राख फांसून आणि तोंडानें राम राम ह्मणून

किंवा समाधि लावून एखाद्या जंगलांत मोक्ष साधन करणें हें अधिक लाभाचें असा अर्जुनास दाट भ्रम झाला आणि हातांतलें हत्त्यार त्यानें लगेच झुगारून दिलें. हिंसा सोडून अहिंसक बनण्यांत अर्जुनास विशेष लाभ वाटूं लागला असें पाहून कृष्णामध्यें ईश्वरी कळा—जशी पूर्वी एकदा मृत्तिकाभक्षणाचे प्रसंगीं आणि दुसऱ्यानें दुर्योधनाकडे शिष्टाई करण्यास गेला त्या प्रसंगीं तशीच पुनः तिसऱ्यानें या प्रसंगीं—उचंबळूं लागली आणि अहिंसेच्या निवृत्तिमार्गानें गेल्यास जो लाभ होतो तो हिंसेच्या प्रवृत्तिमार्गानें गेल्यास होत नाहीं असा अर्जुनास झालेला दाट भ्रम निभ्रांत घालवण्यासाठीं त्यानें अर्जुनास उपदेश केला. या उपदेशानें झालेला दाट भ्रम नाहींसा होऊन झुगारून दिलेलें हत्त्यार अर्जुनानें पुनः हातीं घेतलें आणि जे कोणी पुढें उभे येऊन ठाकले—ते आजोबा असोत, गुरुजी असोत किंवा दुसरे कोणी असोत—त्यांचा आपल्या अंतःकरणास थोडीही कींव न येऊं देतां उज्जू संहार केला. प्रत्येक हिंदूनें ध्यानांत वागवण्यासारख्या वर लिहिलेल्या प्रसंगीं ईश्वरी कळा उचंबळूं लागलेल्या कृष्णाच्या तोंडांतून जी प्रासादिक सरस्वती सुटूं लागली, तीस "भगवद्गीता" ह्मणतात. ही सरस्वती व्यासानें टिपून ठेविली. व्यासाचें मुळचें नांव "कृष्ण" असें वर्णावरून ठेवलेलें असून अर्जुनासही वर्णावरूनच "कृष्ण" ह्मणत; कृष्णाचें "कृष्ण" हें नांवही मुळचें वर्णावरून पडलें होतें. उपदेश करणाऱ्या कृष्णाचे आईबाप गवळी; ऐकणाऱ्या कृष्णाचे दोन बाप—एक सख्खा आणि एक सावत्र; टिपणाऱ्या कृष्णाचा बाप ब्राह्मण, पण आई कोळीण; याप्रमाणें या तीन्ही "काळ्या" अवतारी पुरुषांची पिढी होती. ज्या धर्मांचें निरूपण भगवद्गीतेंत झालें आहे तो धर्म "भागवती धर्म" या नांवानें नांवाजला आहे. हा भागवती धर्म "महाराष्ट्र धर्मा"चा पाया समजावा.

## २ भगवद्गीतेची मातब्बरी.

वैदिक धर्माचे दोन संप्रदाय आहेत. पहिल्या संप्रदायास "कर्मकांड" किंवा "कर्मठांचा संप्रदाय" ह्मणतात, दुसऱ्या संप्रदायास "ज्ञानकांड" किंवा "ब्रह्मज्ञान्यांचा संप्रदाय" म्हणतात. ज्ञानकांडास आधार झालेला जा वेदाचा भाग आहे, त्यास "वेदान्त" किंवा "उपनिषद्" शब्द लावण्यांत येतो. कर्मकांडाची स्थापना वेदाच्या ज्या भागावर झाली आहे, त्यास "वेद" हाच शब्द लावतात. कर्मकांडाची पायरी खालची ठरलेली असून, वेदान्ताची किंवा उपनिषदाची पायरी वरची ठरलेली आहे. संध्या वैश्वदेव आणि हव्यकव्य किंवा यज्ञयाग हा खालचा मार्ग कर्मठांचा समजतात. ज्याच्या पासून ही सृष्टि आरंभीं उत्पन्न होते, ज्याच्यामुळें पुढें उत्पन्न झालेल्या सृष्टीचें

पाळण होतें आणि ज्याच्या आंत अखेरीस तिचा लय होतो, त्या "ब्रह्म"चें म्हणजे परमात्म्याचें ज्ञान गुरूजवळून मिळवून एखाद्या जंगलांत किंवा गुहेंत एकान्तीं समाधीच्या सुखांत दंग होऊन जाणें आणि जन्ममरणाच्या फेऱ्यांतून शाश्वतची सुटका करून घेणें, हा वरचा मार्ग ब्रह्मज्ञान्यांचा म्हणतात.

कर्मकांडी व औपनिषद या दोन्ही धर्मांचें प्रतिपादन करणारा वेद परमात्म्याचा केवळ श्वासोच्छ्वास समजण्याचा वैदिक संप्रदाय आहे. ज्या परमात्म्याचा श्वासोच्छ्वास वेद समजतात त्याच परमात्म्याची कळा वरचढ झालेल्या कृष्णाच्या तोंडांतून परमात्म्याच्या अंशानें ओतप्रोत भरलेली जी स्पष्टार्थ सरस्वती बाहेर पडली ती भगवद्गीता होय. नुसत्या श्वासोच्छ्वासापेक्षां स्पष्टार्थ सरस्वतीची मातब्बरी अधिक होय, ही एक युक्ती. मुंज नसल्यामुळें वेदवाक्य शूद्राच्या किंवा स्त्रीच्या कानीं पडतां कामा नये, असा कर्मठांचा एक कडकडीत नियम आहे. या नियमामुळें वेदवाक्य हव्या त्या मानवी प्राण्याचें सर्वस्व होऊं शकत नाहीं. पण भगवद्गीता वाचण्याचा व समजण्याचा अधिकार जितका वैश्यांस, क्षत्रियांस किंवा ब्राह्मणांस आहे, तितकाच स्त्रियांस आणि शूद्रांसही आहे. त्यामुळें मानवी सृष्टींतील हव्या त्या प्राण्याचें सर्वस्व भगवद्गीता होऊं शकते. जर वेदास कोतेपणा आहे तो नसून आणखीं उलट थोरपणा भगवद्गीतेस आहे तर भगवद्गीतेची मातब्बरी उघड अधिक ठरली, ही दुसरी युक्ती. या दोन्ही युक्ती आजकालच्या स्वकपोलकल्पित नव्हत, तर ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या अखेरीस दाखल केलेल्या आहेत. या दोहोंपैकीं पहिली युक्ती वैष्णवांची असून, दुसरी युक्ती ज्ञानेश्वरांनीं काढिलेली दिसते. या दोन्ही युक्तींवरून भगवद्गीतेची मातब्बरी वेदापेक्षां किती तरी अधिक आहे, ही गोष्ट सहज कळून येते.

## २ वैदिक, औपनिषद आणि भागवती धर्मांचीं मुख्य तत्त्वें.

पूर्वींचे कर्मठ अग्निहोत्राच्या आणि यज्ञभागाच्या लांबलचक खटपटी पत्करीत असत; कां तर, त्यांस मरणानतर प्यावयास अमृत, खावयास कल्पवृक्षाचीं फळें, हुंगण्यास पारिजाताचीं फुलें, बागबगीच्यांमध्यें नानाप्रकारच्या क्रीडा करण्यास अप्सरा—असली सामग्री हवी होती. आपला क्रियाकलाप शूद्राच्या दृष्टीस आणि वेदाक्षर शूद्राच्या कानीं पडूं नये, म्हणून कर्मठांची विशेष खबरदारी असे. जशी ही खबरदारी असे, तशीच खबरदारी यज्ञाची किंवा सत्राची दीक्षा मिळाल्यानंतर प्राकृत भाषेंतील शब्द तोंडांतून न निघण्याविषयीं असे. याप्रमाणें कर्मठ जो क्रियाकलाप करी तो स्वतःस पुढें मेल्या-

नंतर विषयसुख मिळावें म्हणून करी आणि मरेपर्यंत जसा शूद्राचा तसा प्राकृत भाषेचा तिरस्कार हें एक आपलें मुख्य कर्तव्य समजे. क्रियाकलाप ज्यापक्षीं केवळ स्वतःस पुढें सुख मिळावें म्हणून चाललेला असे, त्यापक्षीं कर्मठांची दृष्टि स्वार्थापलीकडे जाण्याचा संभव फारच कमी. आजही एक बायको वारली कीं ६० किंवा ६५ ही वर्षांचा गळून पडायास झालेल्या पानासारखा अग्निहोत्री १० किंवा ८ ही वर्षांच्या कोंवळ्या मुलीशीं तिच्या पुढच्या दुर्दशेकडे दृष्टी बिलकूल न पोंचवतां–लगेच लग्न करतो; कां तर विधुर राहिल्यास अग्निहोत्राचा होम आजच्या अग्निहोत्र्याच्या दृष्टीनें बुडतो, आणि तो बुडाला कीं हा अग्निहोत्री स्वर्गातल्या विषयसुखास मुकला. याप्रमाणें मरेपर्यंत या लोकीं विषयसुख आणि मेल्यानंतर स्वर्गलोकीं विषयसुख मिळून केवळ विषयसुख हाच काय तो एक पुरुषार्थ कर्मठ जाणत.

कर्मठांचें विषयसुख ज्यांस पशूंच्या विषयसुखासारखें भासलें आणि कर्मठांचा शूद्रांच्या संबंधाचा कोतेपणा ज्यांस नापसंत पडला, त्यांनीं अरण्यवास स्वीकारून ध्यानस्थ बसण्याचा क्रम चालवला. एकान्तीं ध्यानस्थ बसून जो आनंद होतो, त्यांत ही मंडळी मग्न होऊन गेली आणि मरणानंतर एकदा परमात्म्यामध्यें बेमालूम मिलाफ होऊन जन्ममरणाचे क्लेश चुकले म्हणजे सगळा कार्यभाग उरकला, असें समजूं लागली. औपनिषद धर्मातला परमात्मा कोणत्याही प्रकारचे विकार ज्यास नाहींत आणि जो केवळ शान्तीनें निरंतर भरलेला असा आहे. ज्यास जन्ममरणाचे क्लेश चुकवायाचे असतील, त्यानें या परमात्म्याचें ज्ञान एकदां करून घेतलें म्हणजे काम झालें. या औपनिषद धर्मामध्यें देखील एका प्रकारचा स्वार्थ झळकतो; कारण ज्यानें त्यानें ध्यानादिक खटपट करायाची ती केवळ स्वतःचे क्लेश चुकवण्यासाठीं करायाची. ही खटपट एकदा सफळ झाली म्हणजे जन्ममरणाचे क्लेश सुटले आणि सहजच स्वार्थ सिद्ध झाला. याप्रमाणें जशी कर्मठांच्या तशी ब्रम्हज्ञान्यांच्याही धर्माची अखेर निव्वळ स्वार्थांत होते.

जी दोन्ही प्रकारच्या वैदिक धर्माची दिशा आहे, तिच्या अगदीं उलट भागवती धर्माची दिशा आहे. कर्मठांस अमृताची तहान आणि अप्सरांची गोडी; परमात्म्याशीं प्रसंगच त्यांस नको होता. वेदांतला क्रियाकलाप दृष्टीस किंवा वेदाक्षर कानीं न पडे इतका दूर शूद्र उभा राहिला आणि दीक्षा घेतल्यानंतर प्राकृत भाषेंतला शब्द तोंडून बाहेर न पडे इतकी खबरदारी ठेविली म्हणजे कर्मठांचे घोडे गंगेंत न्हाले. ब्रह्मज्ञान्यांस नव्हती अमृताची तहान, नव्हती अप्सरांची गोडी, नव्हता वेदांतल्या क्रियाकलापाशीं संबंध; नव्हता प्राकृत भाषांचा तिरस्कार; शूद्रावर किंवा त्याच्याही पलीकडे कोणी

असल्यास त्याच्यावर अनुग्रह करण्यास ब्रह्मज्ञान्याची सदोदित तयारी, इतकेंच कीं ज्यास ब्रह्मज्ञान हवें असेल त्यानें ब्रह्मज्ञान्याचे पाय घट्ट धरले पाहिजेत. अर्थातच ब्रह्मज्ञान्यास इतरांची कळकळ नव्हती, जो एकदा ब्रह्मज्ञानी झाला त्यास इतरांच्या कानीं स्वतःस मिळालेल्या चिंतामणीचा वार्ता घालण्याचा सुप्रसंग स्वप्नींही येण्याचा संभव नव्हता; कारण इतरांनीं ब्रह्मज्ञान्यास हुडकून काढिलें पाहिजे, ब्रह्मज्ञानी कोणासही हुडकून काढण्यास जात नव्हंता. तशांत एकदा युक्ति मिळाली, ह्मणजे जन्माशींच प्रसंग नाहीं; जर ब्रह्मज्ञान्याचा पुनः जन्माशींच प्रसंग नाहीं, तर जन्मास आलेल्या इतरांस ब्रह्मज्ञान्याच्या सत्संगतीचा लाभ होणार कोठून? ब्रह्मज्ञानाचा बेमालूम मिलाफ ज्याच्या आंत अखेरीस होतो त्या परमात्म्यासही कोणत्याही प्रकारचा विकार नसून, तो निरंतर शांतीनें भरलेला; अर्थात त्यासही इतरांची कळकळ असण्याचा संभव नाहीं. कळकळ हा एके प्रकारचा विकार आहे; हा विकार एकदा जोरावूं लागला ह्मणजे हळू हळू शांतीचा फडशा उडवतो आणि चळवळीस सुर्वात होते. भागवती धर्मातील ईश्वरास भक्तांची कळकळ असते. जे अनन्यभावानें त्यास शरण जातात, त्या सर्वांचें योगक्षेम तो चालवतो; इतकेंच नाहीं, तर प्रसंगीं आळवल्यास तो धांवतो आणि पावतो. इतकी कळकळ असली ह्मणजे भक्तांचा छळ चालल्यास प्रसंगीं अवतार घेतल्याशिवाय किंवा विशेष कृपा असलेल्या एखाद्याच्या आंगीं आपली ईश्वरी कळा प्रसंगाप्रमाणें कमजास्त उतरवल्याशिवाय ईश्वरास गति नाहीं. जरी ईश्वरास जन्म नाहीं, तरी भक्तांची कळकळ असल्यामुळें तो जेव्हां प्रसंगीं जन्मतो, तेव्हां त्यानें "अवतार घेतला" असें ह्मणतात. सारांश—भागवती धर्मातील ईश्वराची सगळी प्रवृत्ति केवळ परार्थ आणि त्याही विशेषें करून भक्तांसाठीं असते. भागवती धर्मातील ईश्वराच्या आंगीं भक्तांचा पक्षपात आणि भक्तांचा छळ करणारांचा द्वेष हे दोन विकार खिळलेले असल्यामुळें भागवती धर्मातील ईश्वर निरंतर शांतीचें माहेर राहूं शकत नाहीं. जर भक्तांचा छळ चाललेला नाहीं, जर भक्तांवर संकट कोसळलेलें नाहीं, तर भागवती धर्मातील ईश्वर शांतीचें माहेर आहे. पण भक्ताचा छळ होऊं लागला किंवा भक्तावर संकट ओढवलें कीं भागवती धर्मातील ईश्वराची शांति आटली. अमुक हलक्या कुळांतला किंवा हलक्या जातीचा, अमुक गरीब किंवा दमडी पदरीं नाहीं असला, असली भेदबुद्धि भागवती धर्मातील ईश्वरांत नसल्यामुळें मनुष्य कितीही हलक्या कुळांतला किंवा अठरा विस्वे दरिद्रानें पीडलेला असला, तरी त्यास जबरदस्त आश्वासन मिळतें आणि भक्तांचा कैवारी सर्वशक्तिमंत ईश्वर आपला पाठराखा इतकें तत्व एकदा मनावर नीट ठसलेलें असलें ह्मणजे प्रसंगीं लोकोत्तर बळ आंगीं येऊन धीर खचण्याचा किंवा आवेश कमी होण्याचा प्रसंग सहसा पडत नाहीं. असुर हे कर्मठांच्या मतें अगदीं अस्पृश्य व

अमंगळ होत. पण असुरांच्या कुळांतल्या प्रल्हादास प्रसंगीं नरसिंहावतार धारण करून ईश्वरानें संकटांतून सोडवलें. दुर्वासा हा मोठा कडकडीत आणि कर्मठ असा ब्राम्हण होता. पण त्यानें अंबरीष राजाचा छळ केला, तेव्हां भक्तांच्या महाकैवाऱ्याचें सुदर्शन पाठीस लागलें तें गांजणारा ब्राह्मण जेव्हां गांजलेल्या क्षत्रियाच्या पायीं पडला, तेव्हांच सुटलें. जी भागवती धर्मातल्या ईश्वराची दिशा तीच भागवती धर्मातल्या ईश्वराच्या अवतारांचीही दिशा उघड दृष्टोत्पत्तीस पडते. आपल्या निरपराधी आईचा परशरामानें वध केला; इतकेंच नाहीं, तर रयतेच्या मनांतल्याही दुष्ट वासना हांकवून टाकणारा कार्तवीर्य नांवाचा एक मोठा धार्मिक राजा दत्तात्रेयाचा नांवाजलेला भक्त होता त्याचाही वध केला. जसा निरपराधी आईचा तसा धार्मिक आणि दत्तभक्त राजाचा वध करून, आणखीं दुसऱ्याही क्षत्रियांचा वध परशुरामानें केला असें जेव्हां पाहिलें, तेव्हां या ब्राह्मणवीराचा माज रामावतारानें लीलेनें घालवला.

जसें रामावताराचें एक प्रयोजन या ब्राह्मणाचा माज घालवण्याचें होतें, तसें दुसरें प्रयोजन रावणाची व त्याच्या राक्षसांची मस्ती मोडण्याचें होतें. जे कोणी माज येऊन भगवद्भक्तांचा छळ करितात किंवा त्यांचा वध करितात—ते ब्राह्मण असोत किंवा राक्षस असोत—त्यांस दुसऱ्या जवळून पारिपत्य करवणें किंवा प्रसंगीं अवतार घेऊन तें स्वतः करणें हें भागवती धर्मांतील ईश्वर आपलें एक मोठें कर्तव्य समजतो. " यथा राजा तथा प्रजा " या न्यायास अनुसरून जी दिशा ईश्वराची आणि त्याच्या अवतारांची तीच दिशा भक्तांची असावयाची. जर ईश्वराची आणि त्याच्या अवतारांची सगळी प्रवृत्ति परार्थ, तर भक्तांचीही तशीच पाहिजे. सगळी प्रवृत्ति परार्थ असल्यामुळें जर ईश्वरासही जन्म घ्यावा लागतो तर तशीच प्रवृत्ति राखण्याविषयीं झटणाऱ्या भक्तासही जन्म घेण्याचा प्रसंग पडणार; अर्थातच जन्ममरणाचे क्लेश चुकवण्याकडे भक्ताची यत्किंचितही प्रवृत्ति असण्याचा संभव नाहीं. सारांश, ब्रह्मज्ञानी जन्ममरणाच्या क्लेशास कंटाळून जितका मुक्तीस भुललेला असतो, तितकाच—किंबहुना त्याच्यापेक्षांही अधिक—मुक्तीस कंटाळून केवळ परार्थासाठीं जन्ममरणाचे क्लेश स्वीकारण्यास भक्त सदोदित कंबर बांधून तयार झालेला असतो. याप्रमाणें जसा ब्रह्मज्ञान्याच्या धर्माशीं तसा कर्मठांच्या धर्माशीं, मिळून दोन्ही प्रकारच्या वैदिक धर्माशीं भागवती धर्माचा मोठा विरोध आहे.

## ४ या तीन्ही धर्मांचा जीर्णोद्धार.

बौद्ध आणि जैन या दोन्ही धर्माचा जो पुष्कळ प्रसार झाला, त्याचें मुख्य कारण

बुद्ध व जिन या उभयतांनींही देशी भाषांचा आदर केला, हें दिसतें. सर्व शास्त्रांचीं व विशेषें करून धर्माचीं तत्त्वें सुबोध व सरळ भाषेंत हवींत, दुर्बोध किंवा दूरान्वयी भाषेंत कामाचीं नाहींत. मंत्रता येण्यास भाषा दुर्बोध किंवा दूरान्वयी किंवा मृत असलीच हवी असें नाहीं. महंमदाच्या धर्माचा आरबस्थानांत फार थोड्या काळांत प्रसार झाला, त्याचें मुख्य मुख्य कारण महंमदानें जिवंत आरबी भाषेचा आदर केला हें होय. महंमदाचें सगळें कुराण प्रासादिक ह्मणजे मंत्रमय समजतात, आणि त्यामुळें कुराणाचा पाठ मुळचा जसा असेल तसाच करावा लागतो. ज्याप्रमाणें कर्मठ वेदास शब्दप्रधान समजून "अग्निमीळे"च्या ऐवजीं "वन्हिमीळे" किंवा "वन्हि स्तौमि" असा प्रयोग केल्यास सगळा पाठ निष्फळ समजतात, त्याचप्रमाणें मुसलमानही कुराणास शब्दप्रधान समजून दुसऱ्या पर्याय शब्दाचा प्रयोग करून पाठ केल्यास तो सगळा निष्फळ समजतात. ज्ञानेश्वरांची, एकनाथाची, रामदासाची आणि तुकारामाची सरस्वती जरी देशी भाषेंतच आहे, तरी ती मराठी मंडळांत—जशी ब्राह्मणेतरांकडून तशी ब्राह्मणांकडूनही प्रासादिक समजली जाते. "दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो" या ओवींत "पापाचा काळोख न राहो । ब्रह्मांड स्वकर्मसूर्यतेजें पाहो" अशी शब्दयोजना केल्यास तिचा ज्ञानेश्वरीपणा किंवा "फोडिलें भांडार धन्याचा हा माल" या अभंगांत "उघडिलें कोठार धन्याचा हा दाणा" अशी शब्दयोजना केल्यास त्याचा तुकारामीपणा मावळला आणि जशी ओंवींतून तशी अभंगांतून मंत्रता गेल्यामुळें पाठ कवडीच्या मोलाचा झाला. हाच न्याय इंग्रजी बैबलासही लागू होतो. आज मुळच्या बैबलाचा जो इंग्रजी तर्जुमा आंग्लमंडळांत चालू वहिवाटींत आहे, तोही असाच प्रासादिक समजला जातो. जर thou च्या ठिकाणीं you किंवा thy च्या ठिकाणीं your शब्दाचा प्रयोग करण्यांत आला तर वाक्याचा बैबलपणा अर्थातच प्रासादिकपणा अस्तास गेला. बुद्ध आणि जिन या उभयतांनीं देशी भाषेचा आदर केला ह्मणून त्यांचीं तत्वें अनायासें लोकांस कळून लोकांचा प्रवाह त्यांच्या प्रासादिक देशी सरस्वतीकडे अधिकाधिक वळूं लागला आणि त्या त्या प्रसंगीं देशी भाषेचें ग्रंथभांडार वाढण्यास सवड सांपडली. देशी भाषा ही एका हातांतली मशाल जशी बुद्धास आणि जिनास देशी भाषा समजणाऱ्या लोकांमध्यें सर्वतोमुख पाजळतां आली, तशीच परार्थपणा म्हणजे आपणांस मिळालेल्या चिंतामणीचा लाभ ज्यांस झाला नाहीं त्यांच्याविषयीं नाभिकमळापासून कळकळ ही दुसऱ्या हातांतली मशालही हवी तशी पाजळतां आली. या दोन मशाली नीट पाजळतां आल्यामुळें जसा बौद्ध धर्माचा तसा जैन धर्माचा उजेड जिकडे तिकडे फांकूं लागला. दोन्ही प्रकारच्या वैदिक धर्माचीं तत्वें संस्कृत भाषेंत असून संस्कृत भाषा पुष्कळ लोकांस दुर्बोध पडली आणि दोन्ही प्रकारां-

मध्यें परार्थपणास बिलकुल वाव नव्हता. तेव्हां ज्या दोन मशाली बुद्ध आणि जिन किंवा बौद्ध आणि जैन सहज पेटवूं शकले, त्या मशाली कर्मठांस किंवा वेदान्त्यांस पेटवतां आल्या नाहींत. त्यामुळें जशी कर्मठांस तशी वेदान्त्यांस उतरती कळा लागून बौद्धांस आणि जैनांस चढती कळा लागली. भागवती धर्मानें जरी परार्थपणाची मशाल नीट पाजळलेली होती, तरी भगवद्गीता संस्कृत भाषेंत पडल्यामुळें एका मशालीचा उजेड दोन मशालींच्या उजेडापुढें फिक्का पडूं लागला. अशा प्रसंगीं कुमारिलानें कर्मठांच्या संप्रदायाचा पहिल्यानें जीर्णोद्धार केला, नंतर कांहीं काळानें शंकराचार्यांनीं वेदान्त्यांच्या संप्रदायाचा जीर्णोद्धार केला; पुढें कांहीं काळानें रामानुजानें भागवती धर्माचा जीर्णोद्धार केला. जें देऊळ जीर्ण झालेलें असतें तें दुरुस्त करून पुनः बांधण्यांत आलें, म्हणजे देवळाचा जीर्णोद्धार झाला. देवळाची पूर्वींची लांबीरुंदी आणि आकार जीर्णोद्धारांत कायमच रहातात, असें नाहीं; चिरे, लांकूड, चुना वगैरे दुरुस्तीचा मालमसालाही अगदीं पूर्वीच्या तोडीचा असण्याचा संभव नाहीं. अर्थातच जेव्हां थोडें बहुत जुनें तोडण्यांत येऊन थोडें बहुत नवें जोडण्यांत येतें, तेव्हां जीर्णोद्धार बनतो. जर जुनें होतें तसेंच मोडकें ठेविलें किंवा तें एकदां अगदीं जमीनदोस्त करून नंतर त्याच्यावर अगदीं नवें उठवलें, तर तो जीर्णोद्धार नव्हे. बौद्ध आणि जैन या दोहोंच्याही एकसारख्या चाललेल्या प्रयत्नांनीं कर्मठांची जुनाट इमारत मोडकळीस आली. ती मोडकळीस आलेली इमारत तशीच ठेवणें हें कुमारिलासारख्या अवतारी पुरुषास पसंत पडलें नाहीं. बरें, मोडकळीस आलेली इमारत अगदीं जमीनदोस्त करून तिच्यावर अगदीं नवीन इमारत बांधावी, तर तसें करण्यास जितकें पुण्य खर्चीं घातलें पाहिजे तितकें गांठीं बांधून हा अवतारी पुरुष आईच्या पोटांतून बाहेर पडला नव्हता. म्हणून बौद्धास आणि जैनांस वादांत जिंकून, जे जिंकले गेल्यामुळें खुशीनें कर्मठ झाले त्यास राजाश्रयाच्या बळावर आंत ढकलून, उतरती कळा लागलेल्या कर्मठांच्या कळपास कुमारिलानें बळकटी आणली आणि जिंकले गेले तरी ज्यांनीं दुराग्रह सोडला नाहीं त्यांस राजाश्रयाच्याच बळावर तेलाच्या घाण्यांत घालून मारलें. कुमारिलानें ज्यांची खुशी होता त्या बुद्धांस आणि जैनांस कर्मठ केलें, हें आजच्या कर्मठांस जरी पसंत न पडलें, तरी कबूल केल्याशिवाय गति नाहीं; कारण दंतकथा अशी आहे, इतकेंच नव्हे, तर ती सयुक्तिक असून अनादि संप्रदायही असाच आहे. जो धर्मसंबंधीं वादांत जिंकला जातो तो जिंकणाराच्या धर्माचा होऊन त्याचें शिष्यत्व पत्करतो, यास उदाहरण हवें असल्यास मंडनाचें आणि शंकराचार्यांचें घ्यावें. जिंकला गेलेला मंडन शिखासूत्राचा त्याग करून शंकराचार्यांच्या धर्मांत आला आणि शंकराचार्यांचें शिष्यत्व स्वीकारता झाला.

इतकेंच नव्हे, तर आज बाप्तिस्मा झाल्या नंतर किंवा सुंता झाल्या नंतर पूर्वींच्या आश्रमींचें "नीळकंठ" असें नांव असतें तें जाऊन जसें नवीन आश्रम धारण केल्याची बाइब्लि निशाणी "नेहेमिया" किंवा "अबदुल्ला" असलें विधर्मी नांव मिळतें, तसें मंडनाचें "मंडन" हें पूर्वींच्या आश्रमींचें नांव जाऊन "सुरेश्वर" असें नवीन विधर्मी नांव त्यास मिळालें. तेव्हां जे बौद्ध किंवा जैन वादांत जिंकले गेले त्यांस कर्मठ बनविलें, इतकेंच नव्हे, तर नवीं नांवेंही त्यांस कुमारिलानें दिलीं, असें म्हटल्यास त्यांत कांहीं असंभाव्य नाहीं; कारण त्या काळच्या आमच्या सधर्म्यांचा संप्रदाय—जसा आज आपण विधर्म्यांचा पहातों—तसाच दिसतो.

आतां विचार इतकाच करायाचा कीं हा जीर्णोद्धाराचा भाग कुमारिलानें जुना निराळा होता तो तोडून त्याच्या ऐवजीं बौद्धांपासून किंवा जैनापासून घेऊन नवीनच जोडलेला कीं पूर्वींचा जसा सांपडला तसाच हात न लावतां ठेवलेला. कुमारिल हा अवतारी पुरुष पडला. देवळाचा जीर्णोद्धार करणारा श्रीमंत जसा देवळांतल्या पुष्कळ भागांच्या संबंधानें कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ असतो, तसा धर्माचा जीर्णोद्धार करणारा अवतारी पुरुष ही धर्मांतल्या पुष्कळ बाबींच्या संबंधानें कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् समर्थ असतो, ही गोष्ट जरी निर्विवाद आहे, तरी जो भाग कुमारिलानें उघड नवीन जोडलेला नव्हे, त्याचें श्रेय कुमारिलास देणें वाजवी होणार नाहीं. जो जुना भाग कुमारिलास आढळला, तो तसाच धक्का लागूं न देतां कुमारिलानें ठेवलेला दिसतो. व्रात्य नांवाचे विधर्मी लोक बिहारबंगाल्यांमध्यें होते त्यांनीं कर्मठांस पुष्कळ त्रास दिला होता. या व्रात्यांमध्यें जो विद्वान् किंवा श्रीमंत असेल त्यास व्रात्यस्तोम नांवाचा याग करून आपणामध्यें ओढण्याचा कर्मठांचा संप्रदाय लाट्यायनाच्या कल्पसूत्रावरून शाबीत होतो. वेदाक्षर ऐकणाऱ्या शूद्राच्या कानांत तापलेलें शिसें ओतावें किंवा वेदाक्षर ऐकणाऱ्या शूद्राची जीभ कापावी असले कडक नियम जरी कर्मठांमध्यें चालू होते तरी तितक्यावरून ते शूद्रास आपणामध्यें ओढीत नसत, असें म्हणणें वाजवी होणार नाहीं. या स्थळीं एक मोठी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं आज शूद्र शब्दाचा अर्थ जितका व्यापक होतो तितका व्यापक पूर्वींच्या काळीं होत नव्हता. शेतकी करणारा, गुरें चारणारा आणि व्यापार करणारा या त्रिवर्गाचा समावेश पूर्वी वैश्यांमध्यें होत होता. जर शेतकी करणारा आणि गुरें चारणारा हे दोन वर्ग कर्मठांच्या शास्त्राप्रमाणें वैश्यांमध्यें येतात, तर शूद्र शब्द मराठी कुळंब्यास लावणें मराठी कर्मठांस तरी शोभत नाहीं. अभिप्राय म्हणून इतकाच कीं वेदाक्षर ऐकणाऱ्या किंवा उच्चारणाऱ्या मराठी कुळंब्यांच्या कानांत तापलेलें शिसें ओतण्याचा किंवा त्याची जीभ कापण्याचा प्रसंग मराठी कर्मठांवर कोसळत नाहीं आणि अर्थातच

मराठी कर्मठास कुळंब्याच्या घरीं वेदोक्त करणें असल्यास शास्त्राची आडकाठी मुळींच नाहीं. क्षणभर कल्पना केली कीं आज जसा " शूद्र " शद्वाचा अर्थ व्यापक आहे तसाच पूर्वी होता—तरी देखील जसा शूद्रास वैश्य करून घेण्याचा आणि हळू हळू त्याचे अधिकार वाढवण्याचा तसा ब्राम्हणास क्षत्रियांमध्यें ढकलण्याचा आणि हळू हळू त्याचे अधिकार कमी करण्याचा, हे दोन्ही संप्रदाय स्मृतींमध्यें दाखल झाले आहेत. इतकेंच नाहीं, तर ब्राम्हण क्षत्रिय आणि वैश्य या तीन्ही वर्णांस शूद्राच्या कन्येबरोबर विवाहही करण्याची सवड कित्येक ऋषींनीं ठेविली आहे; इतकेंच कीं असल्या विवाहांत वैदिक मंत्राचा प्रयोग करूं नये. या सर्व गोष्टींचा विचार करतां एक मुद्दा निर्विवाद होता तो हा कीं वेदाक्षर ऐकणाऱ्या किंवा उच्चारणाऱ्या शूद्राच्या ह्मणजे विधर्म्यांच्या संबंधानें नियम होते ते जरी पुष्कळ सख्त होते, तरी विधर्मी वैदिकधर्मी होऊं शकत असे; इतकेंच नाहीं, तर वैदिकधर्म्यांमध्येंही अगदीं खालच्या वर्णांतल्या पुरुषास प्रसंगीं हळू हळू वर चढण्यास सवड सांपडून आणि अगदीं वरच्याही वर्णांतल्या पुरुषास प्रसंगीं हळू हळू खालीं उतरण्याची तजवीज केलेली असून, प्रसंगीं जशी आपआपसामध्यें तशी प्रसंगीं विधर्म्यांशींही बेटीव्यवहारास आडकाठी नव्हती. याप्रमाणें विधर्म्यांचा वैदिकधर्म्यांमध्यें आगम होत असून, वैदिकधर्म्यांमध्येंही गमागम चाललेला असे. जोंपर्यंत भाषेंत किंवा नदीच्या पाण्यांत जिवंतपणा असतो, तोंपर्यंत परकी भाषेंतील शब्दांचा किंवा निरनिराळ्या स्थळांतून वहाणाऱ्या ओढ्यांच्या पाण्याचा आगम चाललेला असून आंतल्या आंतही शब्दांचा किंवा पाण्याच्या खालच्यावरच्या थरांचा गमागम चाललेला असतो; आणि धर्मांत जिवंतपणा असतो तोंपर्यंत विधर्म्यांच्या आगम चाललेला असून, सधर्म्यांमध्येंही गमागम चाललेला असतो. याप्रमाणें बाहेरून आगम आणि आंतल्या आंत गमागम हें जसें भाषेच्या किंवा पाण्याच्या जिवंतपणाचें तसेंच धर्माच्या जिवंतपणाचें मुख्य लक्षण दिसतें. सारांश—युगांतरीं जरी कर्मठांचे नियम फार सख्त होते, तरी धर्मामध्यें जिवंतपणा होता. या मुळच्या जिवंतपणाकडे लक्ष पोंचवून कुमारिलानें बौद्धांस आणि जैनांस कर्मठांच्या मंडळींत सहज ढकलून दिलेलें दिसतें. कुमारिलानें जीर्णोद्धार केल्यामुळें श्रुतींचें ह्मणजे साक्षात् वेदाचें माहात्म्य मावळलें आणि श्रुतींतील दुर्बोध व लांबलचक क्रियाकलापाच्या ऐवजीं स्मृतींतल्या सोप्या व छोट्या क्रियाकलापाची प्रवृत्ति होऊं लागली. पूर्वींच्या अग्निहोत्राच्या ऐवजीं लग्नांतला अग्नी ठेवण्याची वहिवाट पडली आणि अग्निहोत्राच्या होमाचा द्राविडी प्राणायाम एकंदरींत नकोसा झाला. अग्निहोत्री जसे प्रत्येक अवसेस व पूर्णिमेस दर्शपौर्णमास करी, तसे लग्नांतील अग्नी ठेवणाराही करी; इतकेंच कीं दर्शपौर्णमासाच्या लांबलचकपणास फांटा मिळाला. जरी लग्न झालें नाहीं किंवा विधुरपणा आला, तरी

सं. बी. ३५८



अग्निहोत्राच्या ज्या दोन मुख्य देवता सूर्य किंवा अग्नी आणि प्रजापती त्यांस सोम वगैरे इतर देवतांसहवर्तमान प्रत्येक कर्मठाच्या घरीं वैश्वदेवामध्यें रोज सकाळसंध्याकाळ शिजवलेल्या हविष्याचा भाग मिळूं लागला. याप्रमाणें श्रुतींतील मुळच्या क्रियाकलापाची प्रवृत्ति जरी फारशी राहिली नाहीं, तरी रोजच्या ब्रह्मयज्ञांत गायत्री आणि वेदाच्या आरंभींच्या कित्येक ऋचा अजरामर होऊन बसल्या आणि त्यामुळें जरी श्रुतींतील मुळचा क्रियाकलाप लोपला, तरी श्रुतींविषयीं पूज्य बुद्धि कायम राहिली. सोप्या आणि छोटया स्मार्त धर्माची प्रवृत्ति करणाऱ्या ग्रंथांस "गृह्यसूत्रें" ह्मणतात. आश्वलायनाच्या गृह्यसूत्राच्या आरंभीं "समिधमेव श्रद्धान आदधन्मन्येत" आणि "न वै देवा नमस्कारमति यज्ञो वै नम इति हि ब्राह्मणं भवति" अशीं दोन अति सुरेख वचनें दाखल झालीं आहेत. "जर श्रद्धा आहे तर देवतेच्या नांवानें एकच समिध होमांत टाकलेली पुरे आहे; फार तर काय, नुसत्या नमस्काराचाही देवतेकडून अव्हेर होत नसतो, कारण विचार केल्यास नमस्कारांचाच यज्ञ बनलेला असतो"—असा वरील दोन वचनांचा अभिप्राय आहे. अशा प्रकारें प्रत्येक धर्माचें अविचाल्य मूळतत्व गृह्यसूत्रकारांच्या हातीं लागलें, ह्मणून जरी वैदिक क्रियाकलापाचा लोप झाला, तरी बाजारबुणग्याचीही वेदावरची पूज्यबुद्धि कायम होऊं शकली.

जसा कुमारिलानें कर्मठांच्या धर्माचा जीर्णोद्धार केला, तसा शंकराचार्यांनीं औपनिषद धर्माचा केला. शंकराचार्यांच्या पूर्वी जशीं उपनिषदें होतीं, तसा औपनिषद धर्मही होता. पण उपनिषदांचें अध्ययन अरण्यांत एकान्तीं होत असल्यामुळें आणि तेंही अध्ययन विधुरानें किंवा बायको जिवंत असल्यास बायकोची परवानगी मिळेल तर मात्र तीस सोडून देऊन नवऱ्यानें गृहस्थाश्रमांतील स्मार्त धर्माचें पुष्कळ वर्षे अनुष्ठान झाल्यानंतर ह्मातारपणीं करण्याचा परीपाठ पडल्यामुळें, ब्रह्मज्ञानाच्या जोतीचा उजेड पुष्कळ मंदावला होता. जे कित्येक वेदांती बायको बरोबर आल्यास तिच्या सहवर्तमान किंवा तिच्याशिवाय अरण्यांतच लहानशी "कुटी" किंवा मठी बांधून रहात, त्यांस "कुटीचक" ह्मणत; जे तीर्थयात्रा करीत फिरत, त्यांस "बहूदक" ह्मणत; जे कोरान्नाच्या भिक्षेवर निर्वाह करीत, त्यांस "हंस" ह्मणत; जे कोणाच्याही हातची ओली भिक्षा घेत किंवा कोणाच्याही घरीं जेवीत त्यांस "परमहंस" म्हणत. बायको बरोबर असल्यास "वानप्रस्थ" ह्मणत आणि बायको बरोबर नसणाऱ्या कुटीचकापासून तों परमहंसापर्यंत सर्वांस "परिव्राजक" शब्द लावण्यांत येई. जसा वानप्रस्थांचा तसा परिव्राजकांचा ह्मातारपणीं दीर्घोद्योग चाले तो अर्थातच स्वतःच्याच उद्धारासाठीं चाले; दुसऱ्यांच्या उद्धाराची कल्पना त्यांच्या स्वप्नींही येण्याचा संभव नव्हता. ब्रह्मचर्य संपल्यानंतर प्रत्येकानें पहि-

त्यानें गृहस्थ बनावें आणि नंतर म्हातारपणीं वानप्रस्थ बनून पुढें कांहीं वर्षांनीं "परिव्राजक" किंवा "संन्यासी" बनावें, अशी व्यवस्था वैदिकधर्म्यांमध्यें शंकराचार्यांचे काळीं कायम होऊन राहिलेली दिसते.

याच जन्मीं यौवनावस्थेंत क्रियाकलापाच्या अनुष्ठानानें चित्तशुद्धि झाल्यानंतर म्हातारपणीं वानप्रस्थपणा आणि अखेरीस संन्यास, अशी जी व्यवस्था वैदिकधर्म्यांनीं लावून ठेविली होती, ती स्वतःच यौवनावस्थेंत संन्यास घेऊन शंकराचार्यांनीं झुगारून दिली. "ज्या दिवशीं वैराग्य उत्पन्न होईल त्याच दिवशीं संन्यास घ्यावा" असें उपनिषदांमध्यें एक वचन आहे त्या वचनाच्या जोरावर कर्मठांनीं कल्पिलेल्या क्रमावर शंकराचार्यांनीं पाणी ओतलें. वेदांतल्या क्रियाकलापापासून चित्तशुद्धि होते आणि चित्तशुद्धि होते तेव्हांच ब्रह्मज्ञानाचा अधिकार येतो, हें वैदिकधर्म्यांचें ह्मणणें शंकराचार्यांस सर्वांशीं कबूल होतें. पण वैदिकधर्मी ह्मणत कीं वेदांतल्या क्रियाकलापाचें अनुष्ठान याच जन्मीं अर्थात यौवनावस्थेंत होईल तेव्हां म्हातारपणीं ब्रह्मज्ञानाचा अधिकार येईल; आणि शंकराचार्यांनीं तर असें ठरविलें कीं जर ब्रह्मज्ञानाकडे ओढा आहे, तर चित्तशुद्धि झालेलीच असली पाहिजे—मग चित्तशुद्धीचें कारण जो वेदांतला क्रियाकलाप त्याचें अनुष्ठान जर ब्रह्मज्ञानाच्या अधिकाऱ्यानें या जन्मीं केलेलें आढळलें नाहीं, तर तें पूर्वजन्मीं केलेलें समजावें. याप्रमाणें पूर्वजन्माचा चंचूप्रवेश एकदा झाला ह्मणजे या जन्मीं वेदांतल्या क्रियाकलापाचें अनुष्ठान करण्याची जरूरी उरली नाहीं; आणि त्यामुळें कर्मकांडाकडे सहजच गौणत्व येऊन ब्रह्मज्ञानाकडे मुख्यत्व आलें. वेदाक्षर शूद्रानें ऐकूं नये किंवा बोलूं नये, हें कर्मठांचें ह्मणणें शंकराचार्यांनीं सर्वस्वीं कबूल केलें; पण ब्रह्मज्ञानाची पायरी वेदाच्याही वरची ठरवून, तिचा लाभ शूद्रासही स्मृतीच्या द्वारें करून घेतां येईल अशी व्यवस्था लावून ठेवल्यामुळें, ब्रह्मज्ञान प्रतिपादन करणाऱ्या स्मृतींचें माहात्म्य जितकें वाढलें, तितकेंच कर्मठांच्या श्रुतींचें माहात्म्य मावळलें. जर या जन्मीं वेदांतल्या क्रियाकलापाची जरूरी नाहीं, तर पूर्व जन्मीं अनुष्ठान केलेल्या वेदांतल्या क्रियाकलापापासून ज्यांचें चित्त शुद्ध झालें असेल त्यांस हुडकून काढणें आणि जन्ममरणाचे क्लेश चुकवणारा ब्रम्हज्ञानाचा चिंतामणी त्यांच्या पदरीं टाकणें, हा एक मोठा पुरुषार्थ बनला; आणि अशा प्रकारचें परार्थपणाचें वारें नवीनच आंगीं आलेले शंकराचार्यांचे शिष्य जशी अनेक उपजत तैलबुद्धी कर्मठांची तशी अनेक भोजनबंधू कर्मठांचीही कर्ममार्गावरली श्रद्धा उडवून टाकूं लागले. हें परार्थपणाचें वारें संन्याश्यांच्या आंगीं भरल्यामुळें औपनिषद धर्मास एक अपूर्व स्वरूप प्राप्त झालें.

मरणोत्तर शून्यांत लय होणें, हा जसा बौद्धांचा तसाच जैनांचा मोठा पुरुषार्थ. वेदोक्त्यांचा मरणोत्तर लय व्हावयाचा, तो ब्रह्मरूपी एका उत्तमोत्तम वस्तूमध्यें. उत्तमोत्तम वस्तूमध्यें लय होण्याची आशा असली म्हणजे ज्या प्रकारचें लोकोत्तर स्फुरण आंगीं येण्याचा संभव आहे, त्या प्रकारचें लोकोत्तर स्फुरण शून्यांत लय होण्याच्या आशेनें येण्याचा संभव नाहीं. अर्थात वेदांत्यांची तड ठरलेली असून ती त्यांस तशी ठरलेली प्रत्यक्ष दिसत होती आणि म्हणूनच त्यांचें पोंहोणें त्या तडीस अनुलक्षून होतें. जसें बौद्धांचें तसें जैनांचेंही पोंहोणें सैरावैरा गटकळ्या खाण्यासारखें होते; कारण जी शून्यरूपी तड त्यांनीं कल्पिली होती तीस ठरींवपणा नव्हता; आणि जर तडीसच ठरींवपणा नाहीं, तर बौद्धांचें आणि जैनांचें पोंहोणें तीस अनुलक्षून तें कसें असणार? सारांश—जो भरींवपणा जसा भागवती धर्मांत तसा औपनिषद धर्मांत सांपडतो, तो भरींवपणा कोणासही बौद्धांच्या किंवा जैनांच्या धर्मांत सांपडण्याचा संभव नाहीं; आणि जर भरींवपणा नाहीं, तर धर्म उघड मृगजळाच्या योग्यतेचा झाला. हा भरींवपणा परार्थपणाचें वारें आंगीं भरलेल्या संन्याश्यांनीं दृष्टीपुढें ठेवतांच, मरणोत्तर शून्यांत स्वतःस बुडवून घेऊं इच्छिणाऱ्या बौद्धांच्या आणि जैनांच्या तोंडास पाणी सुटून त्यांची प्रवृत्ति औपनिषद धर्माकडे अनायासें झालेली असण्याचा संभव आहे. जी अवतारी कळा कुमारिलामध्यें होती, तिच्यापेक्षां अधिक अवतारी कळा शंकराचार्यांमध्यें होती. बौद्धांस आणि जैनांस जानवीं देऊन, कुमारिलानें कर्मठांच्या धर्मांत जिवंतपणा आहे हें शाबीत केलें, हें सुरेख काम केलें. कर्मठांच्या धर्मास कुमारिलानें दिलेल्या या रसायनांत जर परार्थपणाची थोडी तरी मात्रा पडती, तर पाक अत्युत्तम उतरता. परार्थपणाचें वारें आंगीं भरलेले शिष्य आणि भरलेल्या शिष्यिणी गांवोगांव आणि देशोदेश फिरावयास लागून जर वेदाक्षर गाजवत्या आणि सांपडेल त्याच्या कानीं समारंभपूर्वक तें जपत्या, तर काम अति सुरेख होतें. हा जो अतिसुरेखपणाचा कार्यभाग कुमारिलाचे काळीं अवशिष्ट राहिला होता, तो उरकून जाऊन वैदिक धर्मास पूर्णपणा यावा म्हणून शंकराचार्यांची योजना झालेली दिसते. जें शूद्रांनीं उच्चारतां कामा नये किंवा कानीं पडूं देतां कामा नये त्या जड वेदाक्षराची मातब्बरी अर्थातच कमी ठरवून, ज्याचा श्वासोच्छ्वास तें जड वेदाक्षर समजण्याचा संप्रदाय आहे त्या चेतन परमात्म्याची मातब्बरी शंकराचार्यांनीं अधिक ठरविली आणि त्याच्याकडेस जाऊन मुक्ती मिळवणें असल्यास वेदाक्षराशिवायही ती—शूद्रासच नव्हे, तर शूद्राच्याही खालच्यास—सहज मिळूं शकते, असा एक अतिशय व्यापक सिद्धांत करून ठेवला. जर ब्रह्मज्ञानाचा चिंतामणी वेदाक्षराशिवायही मिळवतां येतो तर वेदाक्षराचीच नव्हे, तर

प्रसंगीं संस्कृत भाषेचीही गरज राहिली नाहीं, हा एक विशाल सिद्धांत येथें गर्भित होऊन राहिला आहे. ज्याप्रमाणें बौद्ध किंवा जैन भिक्षुकांचा आणि भिक्षुकिणींचा वर्ग आपापला धर्म गाजवीत फिरे, त्या प्रमाणें शंकराचार्यांच्या संन्याश्यांचा आणि संन्याशिणींचा वर्ग ब्रम्हज्ञान गाजवीत फिरूं लागला. शंकराचार्यांच्या शिष्यवर्गातील संन्याश्यास "गोसांवी" आणि संन्याशिणीस "गोंसावीण्" शब्द देशी भाषेंत प्रायः लावण्यांत येतो. जर कर्मठांचा धर्म आणि त्या धर्माचा आधार आजही कायम राहिला आहे, तर तो मोठा उपकार कुमारिलाचा. जी परार्थपणाची वाट कुमारिलाच्या हातून वैदिकधर्म्यांस दाखवणें झालें नाहीं, ती दाखविली; इतकेंच नाहीं, तर शून्याच्या पोकळ दिशेपेक्षां परमात्म्याची भरींव दिशा दाखवतां आल्यामुळें, जें समाधान बौद्धांच्या किंवा जैनांच्या स्वप्नींही येण्याचा संभव नव्हता तें समाधान वैदिकधर्म्यांस सहज मिळूं शकलें आणि हतवीर्य व हतप्रभ होऊन जसा बौद्धांस तसा जैनांस गाशा गुंडाळावा लागला. हा सगळा प्रभाव एकट्या शंकराचार्यांच्या सूत्रांचा दिसतो.

जसा कुमारिल आणि शंकराचार्य या दोहोंनीं दोन वैदिक धर्मांचा जीर्णोद्धार केला, तसा रामानुजानें भागवती धर्माचा केला. शंकराचार्यांनीं श्रुतींस जरी गौणपणा आणला होता, तरी श्रुती मुळींच नकोत अशा प्रकारचा उघड उद्गार काढला नव्हता; इतकेंच नाहीं, तर भगवद्गीता स्मृतीच्या तोडीची ह्मणजे वेदाच्या खालच्या पायरीची समजून तिचा अर्थ श्रुतींच्या अनुरोधानें प्रसंगीं हवा तसा ताणला होता. पण जी श्रुतींच्या गौणपणाची वाट शंकराचार्यांनीं सुचविली होती त्याच वाटेनें पाऊल पडलेल्या वैष्णवांनीं "गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः। या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद् विनिःसृता" असा मोठा सिद्धांत केला होता. त्यामुळें साक्षाद् विष्णूच्या मुखकमळांतून निघालेली गीता मात्र वैष्णवांमध्यें कंठीं आणि संग्रहीं ठेवण्यास लायक ठरून वेदाची मातब्बरी मनस्वी उतरली होती. याप्रमाणें भगवद्गीता मात्र काय तो मातब्बरीचा ग्रंथ मानणाऱ्या आणि तिच्या अनुरोधानें श्रुतींचाही अर्थ लावणाऱ्या वैष्णवांमध्यें रामानुज अवतरला. जसें जीवात्म्याचें परमात्म्याशीं नातें सेवकाचें, तसें परमात्म्याचें जीवात्म्याशीं नातें सेव्याचें असून, हें दोहोंमधील सेवकाचें आणि सेव्याचें नातें निरंतर रहावयाचें, हा एक वैष्णवांचा मुख्य सिद्धांत आहे. या वैष्णवांच्या मुख्य सिद्धांताच्या अनुरोधानें उपनिषदांचा अर्थ रामानुजानें लाविला आणि भागवती धर्माचा जीर्णोद्धार केला.

वाई.

# उत्तरार्ध.

## १ मराठी मंडळ आणि इतर हिंदी मंडळें.

जसे गुजराथी, तेलंगी, कानडी, तम्मुळी, बंगाली, कनोजी, पंजाबी वगैरे मंडळांमध्यें पूर्वी ब्राह्मण होते आणि ब्राह्मणेतर होते, तसेच मराठी मंडळांत होते. जसे इतर मंडळांतील ब्राह्मणांमध्यें आणि ब्राह्मणेतरांमध्यें पोटभेद होते, तसे मराठी मंडळांतील ब्राह्मणांमध्यें आणि ब्राम्हणेतरांमध्यें होते. जसे इतर मंडळामध्यें पूर्वी राजे होऊन गेले, तसे मराठी मंडळांमध्येंही होऊन गेले. तरी जसे मराठी मंडळांतले राजे तसे मराठी मंडळांतले ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामध्यें आणि इतर मंडळांतले राजे ब्राह्मण आणि ब्राम्हणेतर यांच्यामध्यें पुष्कळ अंतर दिसतें. इतर मंडळांतले राजे जो आपल्या धर्माचा नसेल त्याचा प्रायः छळ करीत. शालि॰ च्या ११ व्या शतकांत मराठी मंडळांत गंडरादित्यासारखे जे शेलार कुळीचे राजे होऊन गेले, त्यांनीं जसा वैदिकधर्म्यांस तसाच शैववैष्णवांस आणि बौद्धजैनांस आश्रय दिला होता. मराठी मंडळांतील ब्राह्मणांची ब्राह्मणेतरांविषयीं कळकळ विशेष असल्यामुळें, जसा इतर मंडळांत प्रायः ब्राह्मणेतरांचा ब्राह्मणांशीं द्वेष माजलेला असे, तसा मराठी मंडळांत नसे. संस्कृत भाषा न समजणाऱ्या ब्राह्मणांच्या आणि ब्राह्मणेतरांच्या कळकळीनें बाळबोध ग्रंथ रचून देशी भाषेचें सौभाग्य वाढवणारे बरेच ब्राह्मण ग्रंथकार मराठी मंडळांत होऊन गेले. ज्या कोणांसाठीं खरी कळकळ दाखवण्यांत येते, ते ती दाखवणारांचा द्वेष एकंदरींत कधींही करणार नाहींत. मराठी मंडळांतील ब्राह्मणेतरांची मंडळी वरील दरोबस्त ब्राह्मण ग्रंथकारांस पूज्य मानते. मराठी मंडळांतील ब्राह्मणही वंद्य झालेल्या ब्राह्मणेतरांच्याही पायीं संकोच न बाळगतां पडून आपल्या मनाचा थोरपणा जाहीर करीत आणि दरोबस्त जातींच्या लोकांस उत्तम उदाहरण घालून देत. ज्याप्रमाणें तुकारामाचें त्याप्रमाणें चोख्याचेंच नव्हे तर शेखमहंमदाचेंही नांव घेऊन आपण धन्य झालों असें ह्मणण्याचा आणि जो भगवद्भक्त असेल तो जातीचा कोणीही असला तरी जसा त्याच्याविषयीं पूज्यबुद्धि ठेवण्याचा तसा प्रसंगीं ती दाखवण्याचाही संप्रदाय मराठी मंडळांतल्या ब्राह्मणांनीं घालून ठेवला आहे. इतर मंडळांतील ब्राह्मण प्रायः निव्वळ भिक्षाबहादुर आणि कर्मठ असून, ब्राह्मणेतर तलवारबहादुर असत. मराठी मंडळांतील ब्राह्मणांमध्यें जसे भिक्षेवर निर्वाह करून मंडळांतल्या आचांडाळ लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं आपला देह चंदनाप्रमाणें झिजवणारे नामांकित भगवद्भक्त होऊन गेले, तसेच नामां-

कित तलवारबहादुर होऊन गेले; इतकेंच नव्हे, तर ब्राह्मणेतरांमध्येंही जशी भगवद्भक्तींत आणि लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं चालवलेल्या प्रयत्नांत तशी मुत्सद्दीपणांतही ब्राह्मणांच्या अगदीं बरोबरीची—प्रसंगीं ब्राह्मणांसही खालीं पाहूं लावणारी—अशी नामांकित मंडळी होऊन गेली. मराठी मंडळांतल्या पुरुषांस शोभत, अशाच मराठी मंडळांतल्या बायका होत्या. जशा पतिप्रेमानें सती जाणाऱ्या तशा पतीच्या मरणोत्तर पाट न लावतां लोकांस उपदेश करून किंवा राज्याचा सगळा कारभार चालवून आपलें आयुष्य सार्थक करणाऱ्या स्त्रिया पूर्वीं मराठी मंडळांत—जशा ब्राह्मणांमध्यें तशाच ब्राह्मणेतरांमध्यें—होऊन गेल्या. हिंदुस्थानांतील इतर मंडळांतल्या लोकांमध्यें आणि मराठी मंडळांतल्या लोकांमध्यें इतकें अंतर पूर्वीं होतें, त्याचें कारण काय ? कोणतेंही मंडळ घेतलें तरी त्यास एक आंतलें आणि एक बाहेरचें अशीं दोन आंगें असतात. धर्म हें प्रत्येक मंडळाचें जसें आंतलें आंग ठरतें, तसें सारस्वत आणि लोक हें बाहेरचें आंग ठरतें. मंडळाचें बाहेरचें आंग हें आंतल्या आंगाचें एकंदरींत प्रतिबिंब असतें. जर धर्मरूपी अंतरंग भरींव असलें, तर सारस्वतरूपी बहिरंगांत भरींवपणा येऊन, त्या सारस्वतांत रात्रंदिवस मुरून राहणाऱ्या लोकांच्याही आंगीं भरींवपणा येतो. सारांश—जर मराठी लोकांमध्यें एका प्रकारचा भरींवपणा आहे, तर तो भरींवपणा त्यांच्या सारस्वतांतून त्यांच्या धर्मांत हुडकीत गेलें पाहिजे. जर मराठी मंडळांतल्या लोकांच्या—जसे ब्राह्मणांच्या तसे ब्राह्मणेतरांच्या-आंगीं कित्येक उमदे गुण आंगचेच दिसतात, तर हें असें उमद्या गुणांचें वारें आंगीं वाहूं लावणाऱ्या मराठी धर्माकडे नजर फेंकणें जरूर आहे.

## २ मराठी धर्माचें इतिहासानिशीं स्वरूप.

जी घरांतली भाषा असते, त्याच भाषेंत प्रत्येकाचा धर्म असला पाहिजे. धर्माच्या आणि घरच्या भाषेंत थोडें अंतर असल्यास चालेल. पण जर धर्माची भाषा अगदीं निराळी पडली, तर धर्माचीं मुख्य तत्वें कुटुंबांतील माणसांच्या मनावर ठसण्यास आणि ठसवण्यास विशेष आयास पडतात. कोणताही एक धर्म सगळ्या मानवी सृष्टीसाठीं समजतां येत नाहीं, कारण सगळ्या मानवी सृष्टीची भाषा आजपर्यंत कधींही एक नव्हती. कोणत्याही धर्मसंस्थापकाची जी जन्मभाषा असते, ती बोलणाऱ्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं त्या त्या धर्मसंस्थापकाचा जन्म झालेला समजावा. जसा ख्रिस्ताचा जन्म मुळचा यहुद्यांसाठीं होता, तसा महंमदाचा जन्म मुळचा आरबांसाठीं होता आणि बुद्धाचा किंवा जिनाचा जन्म प्राकृत भाषा बोलणारांसाठीं होता. बौद्ध

आणि जैन हतवीर्य झाल्यानंतर कांहीं काळानें मराठी कानडी आणि तेलंगी या तीन भाषा अर्वाचीन काळचें स्वरूप धारण करूं लागलेल्या दिसतात. ही भाषाक्रांती झपाट्यानें चालल्यामुळें बौद्धांच्या आणि जैनांच्या शास्त्रांच्या भाषा मृत होऊन दुर्बोध झाल्या आणि ती ती देशी भाषा बोलणारांचा जमाव जमत चालला. संस्कृत भाषा तर कुमारिलानें जीर्णोद्धार केला, तेव्हांही मृतच होती. शालि० च्या दहाव्या शतकाच्या पूर्वी एकदा हर्ष विक्रमादित्याचा मोड शालिवाहनी वंशांतील राजानें करून शकाची स्थापना केली तेव्हां एकदा आणि पुन: पांचशें वर्षांनीं हर्षवर्धनाचा मोड करून पुळकेशीनें त्यास नर्मदेच्या पलीकडे पिटाळून लावलें तेव्हां एकदा मिळून–दोनदा मराठ्यांनीं नांव गाजवलें होतें आणि शालिवाहनी वंशांतील राजांनींही अनेक ग्रंथकारांस पदरीं आश्रय देऊन वाढविलें होतें. पण देशी भाषा बोलणारांचा जमाव जमत चालल्यापासून नवीन मन्वंतरास आरंभ झाला आणि शालिवाहनाच्या ११ व्या शतकांत दक्षिण दिशेची हवा पालटत पालटत इतकी पालटली कीं अखेरीस–जशी मराठी मंडळांत एक तशी कानडी मंडळांत एक आणि तेलंगी मंडळांत एक मिळून—तीन स्वतंत्र गाद्या स्थापना होण्याचा रंग दिसूं लागला.

मराठी मंडळांत जाधव कुळींतल्या बल्लाळ किंवा भिल्लम नांवाच्या पुरुषानें जोगाईचें आंबें या ठिकाणीं नवीन गादी शालि० शके १११४च्या सुमारास स्थापिली. बल्लाळाचा मुलगा जयंतपाळ गादीवर असतां मुकुंदराज नांवाच्या ब्राम्हणानें औपनिषद धर्म राजाच्या लक्षांत नीट यावा म्हणून " विवेकसिंधु " नांवाचें एक छोटें ओंवीबद्ध प्रकरण मराठींत रचलें. मराठी मुलुखाची हवा एकंदरींत कर्मठांस किंवा ब्रम्हज्ञान्यांस सांगण्यासारखी मानवत नाहीं. कर्मठांचा किंवा ब्रम्हज्ञान्यांचा मराठी मंडळांत कोणी छळ करतात किंवा द्वेष करतात असें समजूं नये. ज्याप्रमाणें इतर धर्माच्यांस मराठी मंडळांत स्थळ मिळालें आहे, त्याप्रमाणें या दोन वैदिकधर्म्यांसही मिळालेलें आहे. पण मराठ्यांचा एकंदरींत ओढा जसा कर्मठपणाकडे नाहीं, तसा ब्रम्हज्ञानाकडेही नाहीं. कर्मठांच्या हाडीं शूद्रांचा आणि देशी भाषेचा तिरस्कार हे दोन दोष अतीच खिळलेले असतात; त्यामुळें त्यांच्या संप्रदायाकडे त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाचें लक्ष वळत नाहीं, त्यांत नवल नाहीं. एकंदरींत कर्मठांच्या धर्मामध्यें दोष ठेवण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. संध्या करणें किंवा गायत्रीचा जप करणें किंवा पूजापाठ करणें यांत वावगें कांहीं नाहीं. देशी भाषेचा तिरस्कार केला, तरी त्यापासूनही फारशी हानी नाहीं. पण दुसऱ्यास आपल्या धर्मांत ओढीत नाहींत, हें मात्र आजचे कर्मठ ठीक करीत नाहींत, असें वाटतें. जर गायत्रीमध्यें–जसें वाऱ्यामध्यें

अगर सूर्याच्या उन्हामध्यें अगर जिवंत पाण्यामध्यें तसें—पावन करण्याचें सामर्थ्य आहे, तर जसा वाऱ्याचा किंवा सूर्याच्या उन्हाचा किंवा जिवंत पाण्याचा उपभोग घेण्याची महारमांगास आणि मुसलमानांसही मोकळीक असते, तशीच गायत्रीच्या जपाचीही असली पाहिजे; कारण पवित्रपणा ब्राह्मणास मात्र हवा, तो महारमांगास किंवा मुसलमानास नको, असा भाग नाहीं. सारांश—जी व्यवस्था पूर्वीच्या काळीं होती आणि ज्या व्यवस्थेचा कुमारिलानें पुनः प्रसंगीं आश्रय केला, तीच व्यवस्था कर्मठ जर पुनः स्वीकारतील, तर अती उत्तम होईल. हा कर्मठांचा विचार कर्मठांनींच करून फाटलेल्या जागीं ठिगळ लावण्याचें काम जारीनें पत्करलें पाहिजे, हें जरी अगदीं खरें आहे, तरी आपल्या बंधूच्या आंगरख्याची फाटकी जागा दिसल्यास ती दाखवणें आणि ठिगळ लावण्याची युक्तीही सुचवणें हें प्रत्येक बंधूचें कर्तव्य आहे; पुढें फाटकें घालणारा बंधू जसा ठिगळ लावण्यास तसा नही लावण्यास मुख्त्यार आहे. मराठी लोकांचा ब्रह्मज्ञानाकडे कल नाहीं, त्याचें मुख्य कारण हें दिसतें कीं आंगीं चळवळीचें वारें विशेष भरलेलें असल्यामुळें, त्यांस स्वस्थ बसणें एकंदरींत आवडत नाहीं; आणि त्यामुळें ब्रह्मज्ञानाच्या शुष्क गोष्टी सांगत बसणें हें त्यांस एका प्रकारच्या नामर्दपणाचें लक्षण भासतें. ह्मणून मुकुंदराजानें प्रयत्न केला तो रुचून राजा जरी ब्रम्हज्ञानी झाला असला, तरी एकंदरींत मुकुंदराजाचा प्रयत्न मंडळामध्यें सांगण्यासारखा फळद्रूप झालेला दिसत नाहीं. जयंतपाळाच्या पश्चाद् गादी देवगिरी मुक्कामीं गेली आणि लौकरच मराठी लोक खालीं कानडी लोकांस आणि पूर्वेस तेलंगी लोकांस दाबीत चालले. शालि० च्या बाराव्या शतकाचे अखेरीस रामदेवराव नांवाचा राजा झाला, त्याच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या सत्तेचा कळस झाला. याच्या राज्याची हद्द खालीं तुंगभद्रा नदीवर गेली होती. हेमाडपंत नांवाचा ब्राम्हण होता तो रामदेव रावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं आणि रामदेवरावाचा चुलता महादेव याचे कारकीर्दींत मुख्य प्रधान होता. हेमाडपंतानें मोडी लिपी सोपी म्हणून आणून कुळकरणांत तिची योजना केली, बाजरीच्या लागवडीस नवीनच उत्तेजन दिलें आणि घरें बांधण्याची एक अपूर्व पद्धती घातली. या हेमाडपंतानें अनेक कर्मठांस आपल्या पदरीं बाळगून "हेमाद्रि" नांवाचा धर्मशास्त्रावरील विस्तृत ग्रंथ त्यांच्या जवळून करविला. हेमाडपंताच्या पदरीं बोपदेव नांवाचा पंडित होता, त्यानें विष्णु भागवत केलें अशी दंतकथा आहे. याप्रमाणें या काळच्या मराठी लोकांचें पाऊल सर्वतोमुख पुढें पडलें होतें.

वर लिहिलेल्या ठळक गोष्टी निःसंशय ध्यानांत वागवण्यासारख्या आहेत. तरी या सर्वांहूनही एक विशेष ध्यानांत राखण्याजोगी गोष्ट रामदेवरावाचे कारकीर्दींत घडून

आली. ती ही कीं ज्ञानेश्वरांनीं देशी भाषेंत ओंवीबद्ध ज्ञानेश्वरी रचून भागवती धर्माचा जीर्णोद्धार केला. हा जो भागवती धर्माचा देशी भाषेंत जीर्णोद्धार झाला त्याच्या पलीकडे आतां पुनः त्या धर्माचा जीर्णोद्धार शक्य दिसत नाहीं, ही त्या धर्माच्या जीर्णोद्धाराची पराकाष्ठा झाली आहे. भगवद्गीतेचें खरें मर्म मराठी मंडळास कळावें, म्हणून साक्षाद् विष्णूनें ज्ञानेश्वरावतार धारण केला अशी, परंपरा आहे. सगळा आंगरस ज्ञानेश्वरांनीं देशी भाषेंत पिळून घेतल्यामुळें, भगवद्गीता आतां रस काढून घेतलेल्या अळत्याच्या मोलाची झाली आहे. ज्ञानेश्वरांनीं जीर्णोद्धार केला आणि जीर्णोद्धार जशी जोड तशीच तोड मिळून झालेला असतो. तर आतां ज्ञानेश्वरांनीं केलेल्या तोडजोडीकडे लक्ष पोंचवण्याचा प्रसंग आला.

जी छोटी जोत प्रत्येकाच्या कुडींत जळत असते तिचें आणि बड्या जोतीचें स्वरूप एकंदरींत एक समजण्यांत कांहीं वावगें नाहीं. मरणोत्तर कित्येकांच्या कुडींतली जोत बड्या जोतींत सामील होते असें म्हटल्यास त्यांतही भलत्यासलत्याचा भास होत नाहीं; कारण ज्या छोट्या जोतींनीं विशेष कृपा संपादन केली असेल, त्यांस बड्या जोतीनें आपणांमध्यें ओढून घेणें ही करुणेची कमाल होते. पण मरणाच्या पूर्वींच जो ब्रह्मज्ञानी झाला त्यास मुक्ती मिळाली असा एक शंकराचार्यांचा सिद्धांत आहे, तो एकंदरींत मानवी मतीस थोडा विलग भासतो. जोंपर्यंत छोट्या जोतीस विहार करण्यास मिळालेलें हें कुडीचें अगदीं आटोपसर स्थळ कायम आहे, तोंपर्यंत त्या जोतीस बड्या जोतीमध्यें अगदीं सामील होऊन जाण्याचा प्रसंग येण्याचा बिलकुल संभव नाहीं. ब्रह्मांडीं प्राण नेतात तेव्हां बड्या जोतींत जो मिलाफ होतो तो अगदीं बेमालूम होतो, असें समजणें वाजवी नाहीं; कारण मिलाफ अगदीं बेमालूम झाल्यास छोट्या जोतीची पाठीं येण्याची वाट बंद झाली पाहिजे. ज्या छोट्या जोतीस बड्या जोतींत सामील होऊन पुनः अलग रहातां येतें, इतकेंच नव्हे, तर कांहीं काळानें गेलेल्याच वाटेनें बिनचूक परतही येतां येतें, त्या छोट्या जोतीचा बड्या जोतींत बेमालूम मिलाफ झाला, असें कसें म्हणतां येईल? याप्रमाणें मरणाच्या पूर्वीं बड्या जोतींत छोट्या जोतीचा बेमालूम मिलाफ होणें संभाव्य नसल्यामुळें, शंकराचार्यांचा एक सिद्धान्त थोडा विसंगत भासतो. सारांश—मरणानंतर भक्ताच्या जीवात्म्याचा परमात्म्याच्या आत्म्यांत—जसा मिठाच्या खड्याचा समुद्राच्या पाण्यांत तसा—बेमालूम मिलाफ होतो, असें प्रतिपादन करणाऱ्या ज्ञानेश्वरांनीं जसा मरणाच्या पूर्वीं बेमालूम मिलाफ प्रतिपादन करणाऱ्या शंकराचार्यांचा तसा जीवात्म्याचें परमात्म्याशीं सेवकपणाचें नातें मरणानंतरही निरंतर राखू पहाणाऱ्या वैष्णवांचा एक सिद्धांत तोडला. मरणानंतर

तरी बेमालूम मिलाफ स्वीकारून ज्ञानेश्वरांनीं एका बाजूनें जसा शंकराचार्यांचा आणि त्यांच्या शिष्यांचा मान राखला, तसा भक्तीची पायरी मुक्तीच्याही वरची ठरवून दुसऱ्या बाजूनें रामानुजाचार्यांचा आणि त्यांच्या शिष्यांचा मान राखला. ब्राह्मणांच्या कुळांत जन्मलेल्या पूर्वीच्या जीर्णोद्धारकारांनीं संस्कृत भाषेचाच आदर केला होता; पण या जीर्णोद्धारकारानें जागत्या देशी भाषेचा आदर केला, ही एक नवीनच जोड दिली. बुद्ध आणि जिन या दोहोंनींही पूर्वी जागत्याच देशी भाषेचा आदर केला होता; पण हे दोघेही मुळखांब क्षत्रियाच्या कुळांत जन्मलेले होते, ब्राम्हणाच्या कुळांत जन्मलेले नव्हते. जीर्णोद्धारास जागत्या देशी भाषेचा आदर करून, ज्ञानेश्वरांनीं एका प्रकारें बुद्धानें आणि जिनानें दाखवलेली वाट स्वीकारली. याप्रमाणें वरील दोन धर्मांच्या संस्थापकांची वाट आणि ज्ञानेश्वरांची वाट जरी पहिल्यानें एक पडली, तरी अखेरच्या दिशा उघड निरनिराळ्या होत्या; कारण बुद्ध आणि जिन यांनीं आपल्या गलबताचें सुकाणूं शून्याच्या दिशेनें फिरवलेलें असून, ज्ञानेश्वरांच्या गलबताचें सुकाणूं भक्तांस मरणोत्तर आपणांमध्यें सर्वांशीं सामील करून घेणाऱ्या परम कारुणिक देवाकडे फिरलें होतें. कुळ ब्राह्मणाचें, साहा शास्त्रें हातचा मळ झालेला, योगाचा अभ्यास केलेला, असा तीन प्रकारचा विशिष्टपणा आंगीं जडलेला असतांही केवळ भक्तीनें नामांकित झालेल्या नामदेवाच्या पायीं स्वतःच पडून ज्ञानेश्वरांनीं मराठी ब्राह्मणांस अत्युत्तम उदाहरण घालून दिलें, आणि हेंच धोरण ठेऊन जातीची मातब्बरी मुळींच न मानणाऱ्या पंढरपुरच्या संप्रदायाची स्थापना केली.

भगवद्गीतेंत "कर्म, धर्म" आणि "स्वधर्म" या तीन शब्दाची योजना बऱ्याच निराळ्या अर्थी केलेली आढळते. "कर्म आणि "धर्म" या दोन शब्दांचा अर्थ संस्कृतांत पुष्कळ स्थळीं यज्ञयागादी कर्मे होतो. पण भगवद्गीतेंत "कर्म" शब्द खाणें पिणें वगैरे रोजच्या व्यापारासही लावलेला असून "धर्म" शब्द प्रायः भक्तीच्या ऐवजीं वापरला जातो. "न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्" असल्या स्थळीं "कर्म" शब्द यज्ञयागास लावलेला मुळींच मानतां येत नाहीं, कारण ज्या कर्माशिवाय क्षणही जात नाहीं असलीं "कर्मे" खाणें पिणें बसणें उठणें श्वासोच्छ्वास टाकणें हीं होत, यज्ञयाग किंवा संध्यावैश्वदेव किंवा हव्यकव्य असल्या कर्माशिवाय क्षणांवर क्षण जाणारे मानवी प्राणी बेसुमार सांपडतील, "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत" किंवा "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय "असल्या स्थळीं "धर्म" शब्दाचाही अर्थ यज्ञयागादिक कर्मे करतां येत

नाहीं; कारण यज्ञयाग करणारांमध्यें जसे सज्जन असतात तसे दुर्जनही असतात आणि अवतार होतो तो यज्ञयाग करणारांच्या किंवा ब्राह्मणांच्याच पाळणासाठीं न होतां, जे सज्जन असतील त्यांच्या पाळणासाठीं आणि जे दुर्जन असतील त्यांच्या संहारासाठीं होतो. " स्वधर्म " शब्दांतल्या " धर्म " शब्दाचा अर्थ या " धर्म " शब्दाच्या अर्थाहून पुष्कळ निराळा आहे. शम दम वगैरे नऊ कर्मे जो उपजत ब्राह्मण असेल त्याचीं, शौर्य तेज वगैरे सात कर्मे जो उपजत क्षत्रिय असेल त्याचीं, कृषी वगैरे तीन कर्मे जो उपजत वैश्य असेल त्याचीं, ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या तीन्ही वर्णांची सेवा हें एक कर्म जो उपजत शूद्र असेल त्याचें; या प्रमाणें चार वर्णांचीं निर-निराळीं कर्मे निरूपण करून, जरी आंत कांहीं व्यंग असलें तरी " स्वधर्म " राखणें हाच उत्तम मार्ग, असा एक मोठा सिद्धांत भगवद्गीताकारानें केला आहे. " नुसत्या स्मशानवैराग्यानें शमदमासारख्या ब्रह्मकर्मांचा अधिकार तुला आला नाहीं " असा अर्जुनास उद्देशून भगवद्गीताकाराचा रोंख आहे. जर अर्जुनाचें वैराग्य केवळ स्मशान-वैराग्य नसतें, तर शमदमाचा स्वीकार करण्याचा जो मनोरथ अर्जुनानें दर्शविला होता, त्याच्या आड भगवद्गीताकार न येता. अर्जुनाचा बाप क्षत्रिय होता तितक्याच-वरून अर्जुनास ब्रह्मकर्मांचा अधिकार नाहीं, असा भगवद्गीताकाराचा कटाक्ष समजतां येत नाहीं. जर पौराणिक काळीं जनक राजा क्षत्रियाच्या कुळांत जन्मून शमदमादिक ब्रह्मकर्मांचा स्वीकार करूं शकला आणि द्रोण ब्राह्मणाच्या कुळांत जन्मून शौर्य-तेजादिक क्षत्रधर्मांचा स्वीकार करूं शकला, जर ऐतिहासिक काळींही ब्राह्मणाच्या कुळांत जन्मलेला रावबाजी क्षत्रधर्मांचा आदर करून आणि क्षत्रियाच्या कुळांत जन्मलेला तुकाराम ब्रह्मकर्मांचा आदर करून नांव गाजवूं शकला, जर रामशास्त्र्या-सारख्या सहा शास्त्रें जाणणाराचा माधवराव पेशव्यासारख्या ब्राह्मणास मन एकाग्र करून क्षत्रधर्माकडेसच लावण्याचा उपदेश होता, तर बापाच्या कुळावर कर्मांचा अधिकार न समजतां, प्रत्येकाची जी उपजत प्रवृत्ती असते त्या उपजत प्रवृत्तीवरच तो अधिकार घालणें अधिक वाजवी दिसतें. भगवद्गीताकाराची उपजत प्रवृत्ती भक्तांचें पाळण करण्याकडे आणि त्यांस गांजणाऱ्या दुष्टांचा संहार करण्याकडे होती; त्यामुळें भक्तांचें पाळण करणें हा जसा भगवद्गीताकाराचा एक स्वधर्म होता, तसा दुष्टांचा संहार करणें हाही एक स्वधर्म होता. याच स्वधर्मास " कर्म " असाही शब्द भगवद्गीतेंत " न कुर्यां कर्म चेदहम् । संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः " असल्या स्थळीं लावलेला आढळतो. ज्या संकराचा आंगास लेप लागूं न देण्याविषयीं खबरदारी ठेवण्यास श्रीकृष्ण अर्जुनास सांगतो तो हा स्वधर्मत्यागरूपी संकर होय. स्त्रियांनीं

पाट लावल्यानें किंवा असल्याच दुसऱ्या कारणांनीं जो वर्णसंकर होतो, तो वर्णसंकर श्रीकृष्ण अनिष्ट समजत नाहीं. "स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः" हा कुळक्ष-यापासून उद्भवणारा मोठा अनर्थ टाळण्यासाठीं अर्जुनानें जी कंबर बांधली होती, ती जर श्रीकृष्णानें भगवद्गीतेचा उपदेश करून अर्जुनाची अर्जुनाजवळूनच सोडवली आणि कुळक्षय करविला, तर अर्जुनास ज्याची धास्ती पडली होती तो नवऱ्याच्या पश्चात् बायकांची पाटाकडे प्रवृत्ति करणारा कुळक्षयरूपी वर्णसंकर श्रीकृष्ण भगवंतास इष्ट होता, असें ह्मटल्याशिवाय चालणें नाहीं. अर्जुन कुळक्षयरूपी वर्णसंकरास भिऊन तो न व्हावा या हेतूनें शमदम स्वीकारूं पहातो आणि अर्जुनानें शमदम स्वीकारून कुळक्षयरूपी वर्णसंकर न केल्यास संकर होईल असा सिद्धांत श्रीकृष्ण भगवान् करतो. अर्थात जो अर्जुनाच्या दृष्टीनें संकर तो खरा संकर नसल्यामुळें, तसल्या संकरास भग-वद्भक्तानें मुळींच भिण्याचें प्रयोजन नाहीं; पण जो श्रीकृष्ण भगवंताच्या दृष्टीनें वर्णसं-कर तोच खरा संकर असल्यामुळें, तसल्या संकरास भगवद्भक्तानें विशेष भिण्याची जरूरी आहे. सारांश—ज्या बेटीव्यवहारास लोक हल्लीं वर्णसंकर समजतात, तो भागवती धर्माप्रमाणें वर्णसंकर नव्हे; तर भटाच्या मुलानें भटच रहावें, शास्त्र्याच्या मुलानें शास्त्राचीच घोकंपट्टी करावी, शिपायाच्या मुलानें शिपायगिरीच करावी, सोना-राच्या मुलानें सोनारकीच शिकावी, माळ्याच्या मुलानें मळाच लावावा, अशी जी व्यवस्था आजचे लोक कायमची समजतात तीच व्यवस्था वर्णसंकराची ठरते. दुस-ऱ्याही प्रकारें या "स्वधर्म" शब्दाची उपपत्ति उघड होऊं शकते. प्रभूची आणि वडिलांची आज्ञा पाळणें हा जसा प्रत्येकाचा "स्वधर्म" होय, तसा जो कोणी आपला अपराध मुळींच नसतां आपणावर चाल करून येईल त्यास ठार करणें हाही संसारांत कालक्रमण करणाऱ्या प्रत्येकाचा "स्वधर्म" होय. "धर्मराज तुझा जसा प्रभू आहे तसा वडीलही आहे; इतकेंच नाहीं, तर तुमचा कांहीं अपराध नसतां सगळे कौरव तुमच्यावर चाल करून येत आहेत, ह्मणून त्यांस ठार करणें हाच तुमचा स्वधर्म आहे"— असा श्रीकृष्णाचा असल्या स्थळीं अभिप्राय दिसतो. जर बाजी प्रभूच्या हातून फाझ-लला थोपवून धरणें झालें नसतें, जर दग्यानें बगलेंत पकडून मानेवर जमदाड चालवूं पहाणाऱ्या अफझुलाची चरबी शिवाजीनें लगेच वाघनखें चालवून बाहेर काढली नसती, जर विश्वासरावानें पाय पाठीं घेतला असता, जर गारदी अहमदशहास फितूर होता, जर मल्हारराव लांडगेतोडीची मसलत सादर न करता, जर खंदक खणून ठेऊनही भाऊसाहेबानें अबदालीशीं तहाचें बोलणें चालवलें असतें, तर जसा बाजीकडून, शिवाजी-कडून, विश्वासरावाकडून, गारद्याकडून आणि मल्हाररावाकडून, तसा भाऊसाहेबाकडूनही

स्वधर्माचा त्याग होता. याप्रमाणें ज्या अर्थी इंग्रजींत Duty शब्दाची योजना करतां येते त्या अर्थी मराठींत "स्वधर्म" शब्दाची योजना करतां येण्याजोगें निरूपण ज्ञानेश्वरांकडून करण्यांत आलें आहे. अशा प्रकारचें "कर्म, धर्म" आणि "स्वधर्म" या तिहींचेंही सुरेख निरूपण करून, मराठी मंडळांतल्या लोकांस ज्ञानेश्वरांनीं जशी दिशा निराळी तशी वाटही निराळीच दाखवून ठेविली आहे.

ज्ञानेश्वरांचें हाड कर्मठाचें ब्रह्मज्ञान्याचें योग्याचें किंवा शुष्क तार्किकाचें नव्हतें, तर निष्काम भक्ताचें होतें. ब्रह्मज्ञान्याचा प्राण ब्रह्मांडीं गेला, म्हणजे ब्रह्मज्ञानी दगडासारखा निश्चेष्ट पडला. पण निष्काम भक्ताचा प्राण ब्रम्हांडीं गेला, ह्मणजे अपरिच्छिन्न परमात्म्याच्या जोराच्या योगानें या परिच्छिन्न जीवात्म्यास कांपरें सुटतें आणि स्वतःच्याच वाणीवर स्वतःचा अंमल चालेनासा होऊन परमात्म्याचे गुणानुवाद तोंडावाटे सटासट बाहेर पडूं लागतात, असो जो अठराव्याच्या आरंभीं उपोद्घात केला आहे, त्यावरून ज्ञानेश्वरांचें हाड शुद्ध भक्ताचें ठरतें, ब्रम्हज्ञान्याचें किंवा योग्याचें उघड ठरत नाहीं. ज्ञानेश्वरांचा जन्म केवळ परार्थ दिसतो. जंगलांत फळमुळें भक्षण करून किंवा आंगास राख फांसून केवळ स्वतःसाठीं मुक्ती मिळवावी, किंवा एखाद्या मठिकेंत ब्रह्मांडीं प्राण नेऊन स्वतःचा तितका अर्थ साधून घ्यावा, असला कोतेपणा ज्ञानेश्वरांमध्यें नव्हता. जातीनें कितीही निकृष्ट असला तरी अतीच उत्कृष्टपणा आणणारा भक्तीरूपी चिंतामणी मराठी मंडळांत सर्वांच्या हातीं लागावा, हा ज्ञानेश्वरी अवताराचा मोठा हेतू होता. हा मोठा हेतू सहज सिद्ध होईल, अशीच व्यवस्था ज्ञानेश्वरांनीं आरंभापासून चालविली. चौफेर संतांची मंडळी माळेसारखी बसलेली असून, मेरूच्या स्थानीं निवृत्तिनाथ असत; आणि चौफेर पसरत गेलेल्या वर्तुळाच्या मध्यभागीं निवृत्तिनाथाकडेस तोंड केलेले ज्ञानेश्वर बसून, भागवती धर्माचा जीर्णोद्धार त्या काळच्या कर्मठांनीं तुच्छ आणि निःसार मानलेल्या मराठी भाषेंत करीत. संतमंडळी फिरती असल्यामुळें, जिकडे जिकडे संत फिरत तिकडे तिकडे ज्ञानेश्वरांनीं पाजळलेली मशाल नेत. त्यामुळें मराठी मंडळांत या मशालीचा उजेड जिकडे तिकडे थोडक्याच काळांत पडत चालला.

हा जो ज्ञानेश्वरीरूपी मोठा "वाग्यज्ञ" विशीच्याही पूर्वी ज्ञानेश्वरांनीं आरंभला आणि संपवलाही, तो "वाग्यज्ञ" सर्वत्र वास्तव्य करणाऱ्या परमेश्वराच्या पायीं निवेदन केला आणि त्याच्यापासून महाप्रसाद मागून घेतला. हा महाप्रसाद आंत कोणत्याही प्रकारच्या कोतेपणास वाव मिळालेला नसल्यामुळें फारच सुरेख बनला आहे. तो महाप्रसाद निवेदनासहित येथें जशाचा तसाच दाखल करण्यांत येत आहे.

" आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें " १
" जे खळाची वेंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचें " २
" दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात " ३
" वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां " ४
" चलां कल्पतरूंचे अरव । चेतनां चिंतामणीचे गांव
बोलते जे अर्णव । पीयूषाचे " ५
" चंद्रमे जे अलांच्छन । मार्तंड जे तापहीन
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु " ६
" किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित " ७

खळांच्या संबंधानें, जीवांच्या संबंधानें, विश्वाच्या संबंधानें, प्राण्यांच्या संबंधानें, ईश्वरनिष्ठांच्या संबंधानें, भूतळाच्या संबंधानें, सज्जनांच्या संबंधानें आणि अखेरीस जसे तीन्ही लोकांच्या तसे आदिपुरुषाच्या संबंधानें, मिळून भूपृष्ठावरील ऐक्याच्या संबंधानें जे सार्वत्रिक उद्गार ख्रिस्ती शकाच्या तेराव्या शतकांत मराठी मंडळामध्यें ज्ञानेश्वरांनीं काढले आहेत, त्यांच्या वरची दिशा या ख्रिस्ती शकाच्या एकोणिसाव्या शतकांत कोणासही दिसलेली असण्याचा संभव नाहीं.

जसा संसाराचा खटारा स्त्री आणि पुरुष या जोडीवर अवलंबून असतो, तसा मंडळाचा खटारा आध्यात्मिक आणि दर्बारी या दोन खात्यांच्या जोडीवर अवलंबून असतो. संसाराच्या खटाऱ्यास जशीं स्त्रीपुरुष हीं दोन्ही चाकें जरूर हवींत, तशीं मंडळाच्या खटाऱ्यास आध्यात्मिक आणि दर्बारी हीं दोन्ही चाकें जरूर हवींत. जर दोन चाकांपैकीं एक चाक पंगू झालें, तर खटारा अडला. दर्बारी खातें मंडळरूपी पुरुषाच्या कायेच्या ऐवजीं असून, आध्यात्मिक खातें वाचेच्या आणि मनाच्या ऐवजीं आहे. रणवीरांची तलवार हा दर्बारी खात्याचा पाया आहे आणि धर्मवीरांची सरस्वती हा आध्यात्मिक खात्याचा पाया आहे. याप्रमाणें शूरांच्या हातांतली तलवार आणि संतांच्या तोंडांतली

सरस्वती या अनुक्रमें उग्र आणि शांत स्वरूप धारण करणाऱ्या देवी एकदा प्रसन्न झाल्या, ह्मणजे मंडळास कसलीही वाण पडत नाहीं. देशी किंवा व्यापक आणि कर्मठ किंवा कोतें अशीं आध्यात्मिक खात्याचीं दोन मुख्य पोटखातीं असतात. देशी किंवा व्यापक खातें असतें, त्याचें दफतर जिवंत देशी भाषेंत असून, कर्मठ किंवा कोत्या खात्याचें दफतर मृत भाषेंत असतें. हवा हा पदार्थ मुख्यत्वें करून—एक प्राणाचा उत्तेजक आणि एक प्राणाचा नाशक, असे—दोन वायू मिळून झाला आहे; अर्थात हा पदार्थ साधित आहे, साधा नव्हे. जोंपर्यंत हे दोन्ही वायू समतोल असतात, तोंपर्यंत हवा मानवी सृष्टीस नीट मानवणारी असते; पण दोन्ही वायूंच्या समतोलपणांत बिघाड झाला कीं हवा बिघडली आणि इजा देणारी झाली. याचप्रमाणें मंडळांतलें आध्यात्मिक खातें साधित असल्यामुळें, त्यांतलि हवा जिवंत भाषा आणि मृत भाषा समतोल असतात तोंपर्यंत निरोगी रहाते; पण दोन्ही भाषांच्या समतोलपणांत बिघाड झाला कीं रोगयांच्या सांथी उद्भवल्या. शालि० च्या तेरावे शतकाचे आरंभीं दर्बारी खात्याचें सुकाणूं रामदेवरावाचे हातीं होतें. व्यापक आध्यात्मिक खात्याचें सूत्र ज्ञानेश्वरांचे हातीं असून, हेमाडपंतासारखा मनानें थोर आणि हाडानें सुधारक असला ब्राह्मण कोत्या खात्याचें सूत्र हालवीत होता, ह्मणून आध्यात्मिक खात्यांतली हवा या शतकांत मंडळांतील लोकांस एकंदरींत सशक्त आणि सतेज करूं शकली.

मराठी धर्माचा ज्ञानेश्वररूपी खंबीर पाया पडल्यानंतर लौकरच ज्ञानेश्वरांचा अवतार संपावा, अशी योजना ब्रम्हांडाच्या महायोजकाकडून करण्यांत आली. महायोजकाची भूलता हालतांच काळपुरुषाकडून नर्मदेच्या उत्तरेस धूळधाणी करून टाकणाऱ्या टोळांची धाड एकाएकीं मराठी मंडळावर अगदीं अनिवार्य अशी जारानें कोसळे इतकी तजवीज करण्यांत आली. लौकरच मुसलमानांच्या तुफानी वावटळीनें मराठी मंडळाची स्वातंत्र्यरूपी इमारत पुरी जमीनदोस्त करून टाकली. जर स्वराज्य नाहीं, तर स्वभाषा नाहीं; आणि जर स्वभाषा नाहीं, तर स्वधर्मही नाहीं; अर्थातच स्वराज्य मावळल्यामुळें भाषेची मातब्बरी मावळली, आणि जिकडे तिकडे बाटवाबाटवी चालल्यामुळें धर्माचीही मातब्बरी लौकरच गाशा गुंडाळणार, असा रंग पुष्कळांस दिसूं लागला. पण भागवती धर्म मुळचाच कोतेपणानें भरलेला नव्हे; कारण तो भगवद्गीताकाराच्याच ह्मणण्याप्रमाणें नाहीं वेदावर किंवा वेदांतावर उभारलेला. तशांत भगवद्गीता संस्कृत भाषेंत असल्यामुळे जी कोतेपणाची शंका कित्येकांस येणार, ती ज्ञानेश्वरांनींच मराठी भाषेंत त्या धर्माचा जीर्णोद्धार करून घालवून दिली होती आणि मागितलेल्या नुसत्या महाप्रसादावरूनही जीर्णोद्धार केलेल्या भागवती धर्माचा व्यापकपणा किती सार्व-

त्रिक आहे तो मुख्य मुद्दा मराठी मंडळांतल्या—जशा अति उत्कृष्ट तशाच अति निकृष्ट कुळांत जन्मलेल्या—स्त्रीपुरुषांच्या लक्षांत आणून ठेविला होता. ख्रिस्ताची मूर्ती एकंदरींत दुराग्रहाच्या गांवाची दिशा पाहिलेली नव्हे. महंमदाची मूर्ती कुराणांत कधी कधीं संतापलेली उघड आढळते, ही गोष्ट खरी आहे. तरी बरेच ठिकाणीं कुराणांत दुराग्रह अगदीं मावळलेला निभ्रांत दिसतो. जर कित्येक ठिकाणीं दुराग्रह निभ्रांत अगदीं मावळलेला आहे आणि जर कित्येक ठिकाणीं दुराग्रहास थोडें भरतें आल्याचा भास होत आहे, तर महंमदाची दृष्टी पहिल्यानें पुष्कळ विशाळ असून कित्येक प्रसंगीं अनेक निमित्तांनीं पुढें थोडी कोती झाली, असें ह्मणावें लागतें. ख्रिस्ताप्रमाणें महंमदही दुराग्रहाच्या गांवीं स्वप्नींही गेलेला नसून, जो दुराग्रह त्याच्यावर लादलेला कुराणांत आढळतो तो तशी समजूत अनेक निमित्तांनीं झाल्यामुळें शिष्यांकडून किंवा शिष्यांच्या करणीमुळें इतरांकडून महंमदावर लादला गेला, असें म्हणण्यास सवड आहे. कुराणांतील प्रासंगिक दुराग्रह शिष्यांच्या समजुतीवर किंवा करणीवर लादल्यास, महंमदाच्या सरस्वतीचा महंमदाच्या कित्येक शिष्यांच्या सरस्वतीशीं मिलाफ होऊन कुराण बनलें, असें समजणें भाग पडतें खरें; पण असें समजण्यास पुरावा नाहींसा नाहीं. सारांश—जसा ख्रिस्त मुळचा दुराग्रही नव्हे, तसा महंमदही नव्हे. पण उभयतांच्याही वाढलेल्या शिष्यवर्गाच्या हातून जो प्रसंगीं फाजिलपणा होत गेला, त्या फाजिलपणाच्या योगानें जसा आजच्या ख्रिस्ती धर्मांत तसा आजच्या इस्मायली धर्मांत बराच दुराग्रह माजलेला आढळतो. हा दुराग्रह माजल्यामुळें, जो आपल्या सगळ्या बाबी कबूल करीत नसेल त्यास जिवंत जाळण्याचा ख्रिस्त्यांमध्यें आणि खुपसून मारण्याचा मुसलमानांमध्यें रिवाज पडला. जो ख्रिस्ती नाहीं तो निव्वळ नरकाचा अधिकारी हा जसा आजच्या ख्रिस्त्यांचा दुराग्रह, तसाच जो मुसलमान नाहीं तो निव्वळ नरकाचा अधिकारी हा आजच्या मुसलमानांचा दुराग्रह. या दुराग्रहास अनुसरून हिंदूंशीं म्हणजे निव्वळ नरकाच्या अधिकाऱ्यांशीं कोणत्याही प्रकारें संबंध न ठेवण्याचा सिद्धांत पूर्वीं मुसलमानांनीं केला होता. आणि त्याप्रमाणें रूढीही पडून गेली होती. असल्या दुराग्रहास—जसा पूर्वीं तसा आजही—वाव नसल्यामुळें, मराठी धर्माची पायरी उघड वरील दोन्ही धर्मांच्या वरची आहे, खालची नव्हे. अग्नी रत्नांचें तेज सहज फिकें पाडूं शकतो आणि चंद्रही लीलेनें नक्षत्रें निस्तेज करतो. पण अग्नीची आणि चंद्राची मातब्बरी केव्हां? तर जेव्हां रात्रीचा काळोख असतो आणि सूर्याचा उदय झालेला नसतो तेव्हां. पण सूर्याचें तेज फांकूं लागलें कीं दिशा उजळूं लागल्या आणि अग्नी फिक्का पडून चंद्रही मावळला. तेव्हां जशी सूर्यापुढें अग्नीची किंवा चंद्राची मातब्बरी निभ्रांत नाहीं, तशी मराठी

धर्मापुढें आजच्या ख्रिस्ती किंवा आजच्या मुसलमानी धर्माचीही नाहीं. या भूपृष्ठावर जितक्या ह्मणून देवाच्या विभूती पसरलेल्या दिसतील तितक्या सर्वांचा सारखा मान राखूं सांगणारा कोठें विशाल मराठी धर्म आणि देवाच्या असुक विभूतीस मानशील तर तरशील, नाहींपेक्षां नरकाग्नीच्या ज्वाळांमध्यें अनंत वर्षे पोळशील, असा उपदेश करून देवाच्या कारुणिकपणावर हरताळ लावूं पहाणारा कोठें कोतेपणानें भरलेला आजचा ख्रिस्तीधर्म किंवा आजचा मुसलमानी धर्म ! ! ! जी बडी जोत ज्ञानेश्वरासारख्या अवतारी पुरुषानें पाजळली होती, तिचा उजेड मुसलमानींत जरी मंदावला होता, तरी ती अगदीं विझून जाण्याचा संभव नव्हता. दोन दोन तीन तीन पिढ्या गेल्यामुळें जें दुराग्रहाच्या महापूरानें साफ वाहावून टाकलें असें पुष्कळांस वाटलें, तें लोहाळ्याप्रमाणें जीव धरून राहिलेलें मराठी रक्त मुसलमान झालेल्या मराठ्यांच्या वाहिन्यांमध्यें देवाच्या कृपेनें पुनः जोर करूं लागलें. जो थोरपणा पूर्वी मुसलमानी धर्मामध्यें नव्हता, तो थोरपणा बाटवलेले अनेक मराठी लोक आंत शिरल्यामुळें मुसलमानी धर्मास आला आणि हिंदूंशीं कोणत्याही प्रकारें संबंध न ठेवण्याचा जो मुसलमानांचा दुराग्रह होता, तो समूळ नाहींसा होण्याचा रंग दिसूं लागला. निजामुल्मुल्क हा मुळचा मराठी ब्राह्मण वऱ्हाडांतल्या पाथ्री गांवच्या कुळकरण्यांपैकीं होता. निजामुल्मुल्काचा नातू बुऱ्हाण जेव्हां निझामशाहीच्या गादीवर बसला, तेव्हां त्याच्या आजोबाच्या पूर्वाश्रमींचे सोयरे त्याच्या जवळ आले आणि आपला वंशपरंपरागत कुळकरणाचा गांव बरीदशहाकडून घेऊन आपणांजवळ द्यावा, असा त्यांनीं अर्ज केला. मुसलमानापासून घेऊन गांव आपल्या ताब्यांत द्यावा असा मुसलमानास हिंदूनें अर्ज करावा आणि अर्ज करणाऱ्या हिंदूचा मनोरथ पूर्ण करण्यासाठीं एका मुसलमानाच्या अंमलांतला गांव दुसऱ्या मुसलमानानें वेढा घालून सर करावा, इतका खटाटोप पत्करण्याकडे सर करणाऱ्या मुसलमानाचें मन आंगांतलें मराठी रक्त जोर करूं लागल्याशिवाय वळणारें नव्हे. याप्रमाणें आपल्या आजोबाच्या पूर्वीच्या आश्रमांतल्या हिंदु नातलगांचे मनोरथ पूर्ण करणारें हें मराठी रक्त ब्राह्मणाचें होतें. यूसफ आदिलशहाची बायको ही मुळची एका मराठी सर्दाराची बहीण पडली. हिचा मुलगा इस्मायल गादीवर बसला त्याच्या आंगीं दुराग्रहाचें वारें मनस्वी भरलेलें असल्यामुळें, या मराठी बाईचें कांहीं चालेना. पण त्याच्या पश्चाद् हिचा नातू गादीवर बसला, तेव्हां हिशोब फार्सींत होते ते मराठींत ठेवण्याचें आज्ञापत्र निघून पुष्कळ मराठ्यांस विजापुरकराचे पदरीं नोकरी मिळूं शकली. याप्रमाणें दुसऱ्यांची भाषा आणि लिपी समूळ बुडवूं पहाणाऱ्या मुसलमानांच्या राज्यांत मराठी भाषेस आणि लिपीस स्थळ मिळून मुसलमानांच्या फार्सी भाषेचें आणि लिपीचें

माहात्म्य कमी झालें, हें काम यूसफाच्या बायकोच्या आंगीं मराठी रक्त जोर करूं लागलें म्हणून झालें. याप्रमाणें देशाच्या भाषेस स्थळ देऊन, ती बोलणारांस अन्नास लावणारें हें मराठी रक्त क्षत्रियाचें होतें.

वर लिहिल्याप्रमाणें मराठी रक्ताचे खेळ सूक्ष्म पहाणाऱ्याच्या नजरेस जरी थोडेबहुत पडत होते, तरी जी ठिणगी जशी काय राखेच्या ढिगांत पडल्यामुळें यवनांची वावटळ जोरानें वाहूं लागली असतांही विझाली नाहीं, तीस बाहेर पडण्यास थोडा तरी वाव मिळाल्याशिवाय भडका होणें नाहीं, आणि तो जोंपर्यंत झाला नाहीं तोंपर्यंत मंडळाचें योगक्षेम नीट चालणें नाहीं, हें उघड होतें. एकाच जातीच्या पुण्यावर किंवा एकाच जातीच्या सत्पुरुषांच्या आशीर्वादावर जर मराठी मंडळास अवलंबावें लागतें, तर पाठीं लागलेल्या साडेसातींतून सुटका होण्याचा योग लौकर न येता. पण जेव्हां सगळ्या जातींतल्यांच्या वडिलांचें पुण्य सांचतां सांचतां बरेंच सांचलें आणि सगळ्या जातींतल्या सत्पुरुषांचे आशीर्वाद मिळूं लागले, तेव्हां देवाचीही कृपा मराठी मंडळावर विशेष झाली. त्यामुळें वडिलांचें पुण्य सत्पुरुषांचे आशीर्वाद आणि देवाची कृपा या त्रिवेणीचा लौकरच संगम होऊन त्यांत मंडळांतल्या हव्या त्या जातीच्या पुरुषास हात धुण्यास किंवा प्रसंगीं आंगही धुण्यास सवड सांपडेल, असा रंग दिसूं लागला. ज्या पैठणकर कर्मठांनीं पूर्वी ज्ञानेश्वरांचा छळ केला होता, त्यांच्याच कुळांपैकीं विठ्ठलभक्तीनें पावन केलेल्या एका कुळांत एकनाथानें जन्म घेतला; आणि जसें ज्ञानेश्वरांनीं दाखवलेल्या वाटेनें तसेंच दिशेनें मंडळांतल्या हव्या त्या पुरुषास जातां यावें या थोर उद्देशानें ज्ञानेश्वरीचा जीर्णोद्धार करून, मराठी धर्माचें अन्नसत्र एकसारखें स्वतःच्या सभोंवतीं चालू ठेवलें. भगवद्गीतेशीं पुष्कळ अंशीं तुलना करतां येईल, असा संस्कृत भाषेंत दुसरा ग्रंथ काय तो एक भागवतच. हें भागवत रामदेवरावाच्या कारकीर्दीत हेमाडपंताचे पदरीं बोपदेव नांवाचा कवी होता त्याच्या कडून रचलें गेलें, अशी दंतकथा आहे ती पूर्वींच दाखल करण्यांत आली आहे. या भागवताचा एकादश स्कंध भक्तीच्या संबंधानें मोठ्या मोलाचा आहे. या एकादशाचें एकनाथानें मराठींत सविस्तर ओंवीबद्ध विवरण केलें आहे. जसें ज्ञानेश्वरीमुळें भगवद्गीतेचें माहात्म्य, तसें एकनाथी एकादशामुळें भागवताचें माहात्म्य मराठी मंडळांत मावळलें. कलियुगांत धर्माचें वाटोळें झालें असा जो मराठी मंडळामध्यें समज झाला होता, तो दूर करण्याविषयीं एकनाथानें बरीच खटपट केली आहे. ज्या मार्गाची दिशा कृत त्रेता आणि द्वापर या युगांतल्या मंडळीस बिलकुल दिसली नव्हती, तसला भक्तीरूपी मार्ग भगवद्गीतेचा उपदेश करणाऱ्या श्रीकृष्णभगवंताकडून खुला झाल्यामुळें कलियुगाची प्रौढी इतर तीन

युगाच्या प्रौढीपेक्षां पुष्कळ वाढली आहे. इतकेंच नाहीं, तर पूर्वींच्या तीन्ही युगांतील प्रजा स्वर्गादिक इतर लोकांमध्यें वसाहती करून आहे, ती एकदा तरी भूलोकीं जन्म घेऊन भगवद्भक्तीचा लाभ होईल तर सुरेख होईल, असा संकल्प करीत बसल्यामुळें या भूलोकाचेंही भाग्य इतर लोकांपेक्षां विशेष वाढलें आहे, असा भागवती श्लोकाच्याच आधारानें एकनाथानें सुरस उद्गार काढला आहे. जो भगवंतास अनन्यभावें शरण गेला, तो नाहीं पितरांचा, नाहीं ऋषींचा, नाहीं देवांचा ऋणी; अर्थातच एक भक्ती हातीं आली कीं नको श्राद्ध, नको वेद, नको यज्ञयाग, हा एक मुख्य सिद्धान्त मनावर ठसेल अशा रीतीनें जाहीर करून, भक्ताची जात विचारण्याचा अधिकार कोणासही नाहीं, हाही एक सिद्धांत एकनाथानें नीट प्रतिपादन करून ठेवला आहे. एकनाथाचे मोठे उपकार मराठी मंडळावर झाले आहेत, ते जातिभेदाच्या शुष्कपणाच्या संबंधानें झाले आहेत. महाराच्या पोरास प्रसंगीं कुरवाळून, महारास प्रसंगीं भरवून किंवा सुग्रास अन्न ब्राह्मणांच्याही पूर्वीं वाढून आणि महाराच्या खोंपटांत प्रसंगीं द्वादशीचें पारणें करून, एकनाथानें बोलणें आणि चालणें या दोहोंमध्यें मेळ घालून दिला. कित्येक लोक कर्मठ ब्राह्मणांस मात्र चारतात, कित्येक ब्रह्मज्ञान्यांस मात्र जेऊं घालतात; पण एकनाथाचे घरीं जो भुकेलेला येई तो ब्राह्मण असला किंवा महार असला, तरी ढेकर देत बाहेर पडे. आपलें करणें रास्त आहे, असें एकनाथ उघड प्रतिपादन करी आणि प्रायश्चित्ताची जरूरी नाहीं असेंही कंठरवानें सांगे. तरी कर्मठांची मंडळी प्रायश्चित्ता-साठीं नदीवर ओढून नेऊं लागल्यास तिची कींव आल्यामुळें मर्मीं प्रहार न करतां मुकाट्यानें तीस एकनाथ स्वतःस नदीवर ओढून नेऊं देई आणि तिनें आंघोळ घात-ल्यास आंघोळही घालून घेई. हरिपंडित नांवाचा एकुलता एक मुलगा होता, तो मोठा कर्मठ निघाला आणि बापाच्या थोरपणास विटून कोतेपणानें काशीवास करता झाला. तरी देशी भाषेच्या ग्रंथांचें भांडार वाढविण्याचें आणि भक्तांच्या मंडळींत जाति-भेदास मज्जाव करण्याचें, मिळून जीं दोन मोठीं कामें आंगावर घेतलीं होतीं तीं कर-ण्याचे कामीं तिळभरही ढिलेपणा एकनाथानें येऊं दिला नाहीं. एकनाथाची दत्तात्रे-याच्या पायीं ऐकांतिक निष्ठा होती. मराठी धर्माचा जीर्णोद्धार करून जो महाराष्ट्र-मंडळाच्या उन्नतीचा पाया एकनाथानें या शतकांत दुसऱ्यानदां घातला तो टोलेजंग इमारतीच्या भाराखालीं न चेंगरे इतका मजबूत व्हावा या उद्देशानें एकनाथाचा अव-तार संपण्याचे पूर्वीं एक वर्ष रामदास आणि तुकाराम या दोन महापुरुषांचा जन्म होईल अशी योजना महायोजकाकडून झाली आणि लौकरच शेवटचा विसांवा घेण्यास एकनाथास सवड सांपडली. रामदासाची जशी रामाचे पायीं ऐकांतिक निष्ठा होती, तशी तुकारामाची विठोबाचे पायीं होती. या दोहोंस वामनाचें आणि शेखमहंमदाचें

नांव जोडलें, ह्मणजे या काळच्या मराठी संतांची चौकडी बनली. वामन हा महापंडित मुळचा काळी रेघ लावणारा कडकडीत वैष्णव असून, जसा मराठी भाषेचा तसा ब्राह्मणेतरांचा कट्टा द्वेष्टा होता. पण एका परम हंसानें वामनाची सगळी दिशा फिरविली आणि तेव्हांपासून सहा शास्त्रें हातचा मळ झालेला हा पंडित आपल्या गिराबाई नांवाच्या बायकोनिशीं मराठी धर्मांत आला. याप्रमाणें दोघे मराठी ब्राह्मण, एक मराठी क्षत्रिय आणि एक मराठी मुसलमान या चार वड्या खांबांवर या काळीं मराठी धर्माचा भार पडला. कोणत्याही इमारतीस जसे बडे खांब लागतात, तसेच छोटे खांब लागतात; नुसत्या बड्या खांबांनीं किंवा नुसत्या छोटया खांबांनीं इमारत उठत नसते. अर्थातच या काळीं मराठी धर्माचे बडे खांब जरी चारच होते, तरी केशवस्वामी भागानगरकर, जयरामस्वामी वडगांवकर, रंगनाथस्वामी वगैरे बरीच मंडळी छोट्या खांबांच्या ऐवजीं झाली होती. "मराठी धर्म" किंवा "महाराष्ट्र धर्म" हा शब्द या काळीं रामदासानें विशेष प्रचारांत आणला. जें खातें तेरावे शतकांत एकटे ज्ञानेश्वर सांभाळूं शकले आणि दर्बारी खातें मावळलें असतांही सोळावे शतकाचे आरंभीं जें एकनाथानें नीट चालविलें, तेंच खातें आतां वाढतें झालेलें पाहून महायोजकाकडून चार खंबीर पुरुषांची योजना करण्यांत आलेली दिसते. जो कर्मठखात्याचा अध्यक्षपणा पूर्वीच्या शतकांत हेमाडपंत नांवाच्या गृहस्थाकडे होता, तो अध्यक्षपणा या शतकांत "गागा" किंवा "काका" नांवाच्या दशग्रंथी भटाचे हातीं आला.

रामदासाचा कटाक्ष जसा कर्मठांच्या सोंवळ्या ओंवळ्यावर आहे, तसाच अज्ञान लोकांच्या जाखाई जुखाई सारख्या क्षुद्र देवतांवरही आहे. रामदासाची प्रसिद्धि महाराष्ट्र मंडळांत "समर्थ" या नांवानें झाली आहे. रामदास आणि तुकाराम ही दुकल जशी ज्ञानेश्वरांनीं दाखविलेल्या वाटेनें तशीच दिशेनें जाणारी पडली. शेखमहंमद हा तुकारामाचा शिष्य एक प्रेमळ विठ्ठलभक्त आणि मराठींत बाळबोध अभंग करणारा होऊन गेला. शेहमहंमदाची शिष्यमंडळी मक्केचें हाज करून, आषाढीकार्तिकीही करते आणि दरवर्षी पंढरपुरीं चंद्रभागेच्या वाळवंटांत प्रेमळपणानें विठ्ठल विठ्ठल म्हणत नाचते. जी वाट ज्ञानेश्वरांनीं दाखवली त्याच वाटेनें डोळे झांकून तुकाराम गेला आणि म्हणूनच "घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं । मुक्ता आत्मस्थीती सांडवीन; ब्राह्मण तो एक चोखाही महार; अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड"–असले अभंग रचूं शकला. "भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत आतां कळों आला" हा तुकारामानें पुनः पुनः गायलेला एक मुख्य सिद्धांत. जर भक्ती मुक्तीच्याही वरची, तर भक्तास मुक्ती नको, तर पुनः पुनः जन्मच हवा आणि भगवद्भक्तांची संगतीही हवी. जितका पुनः

पुन: जन्म येईल आणि भगवद्भक्तांची संगती मिळत जाईल, तितकें इतर लोकांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य आंगीं अधिक येईल, असा विचार करून भक्त असतात ते पुन: पुन: आपणांस जन्मास घालावें असेंच मागणें देवाजवळ मागतात. तुकारामाचेंही " नलगे मुक्तीधनसंपदा । संतसंग देई सदा " असेंच देवाजवळ निरंतर मागणें आहे. रामदासानेंही दासबोधांत याच दिशेनें प्रस्थान ठेवलें आहे; इतकेंच कीं रामदासास रामाचें ध्यान विशेष प्रिय होतें आणि तुकारामास विठोबाचें ध्यान विशेष प्रिय होतें. वामनाचें आवडतें ध्यान कृष्णाचें होतें. वामनही मोठा भगवद्भक्त होता, अर्थातच भक्तीस मुक्तीच्याही वर ठेवणारा होता. पण आंगीं पांडित्य विशेष मुरलेलें असल्यामुळें कित्येकांस पुन: पुन: शंकराचार्यांच्या सिद्धांताकडे वाजवीपेक्षां फाजिल कललेला भासण्याचा संभव आहे. देव एक आहे हा मुख्य मुद्दा जसा एकनाथास माहीत होता, तसाच रामदासास तुकारामास आणि वामनास माहीत होता; तरी एकनाथास दत्ताचें नांव आणि ध्यान आवडे, रामदासास रामाचें आवडे, तुकारामास विठोबाचें आवडे आणि वामनास कृष्णाचें आवडे. अशी स्थिति असल्यामुळें, जरी ध्यानें निरनिराळीं असलीं, तरी दत्त वगैरे निरनिराळीं नांवें एकाच देवास निरनिराळ्या भक्तांनीं दिलीं, असा एक मोठा सिद्धांत मराठी मंडळांत ठरूं पहातो.

शालि० चे तेरावे शतकांत हेमाडपंताचे हातीं कर्मठांचा अध्यक्षपणा होता, तो जसा योग्य पुरुषाचे हातीं होता, तसाच १६ वे शतकांत गागाभटाचे हातीं कर्मठांचा अध्यक्षपणा आला तोही योग्य पुरुषाचे हातीं आला. त्यामुळें शिवाजी क्षत्रिय ठरून मुंजीचा अधिकारी झाला आणि मुंज झाल्यानें शास्त्रोक्त अभिषेकास अडचणी आल्या असत्या त्या सगळ्या सहजच दूर झाल्या.

युगांतरीं वैदिक मंत्रांचा साक्षात्कार झालेले तपोनिष्ठ आणि व्रतनिष्ठ ऋषी सर्वांसही पूज्य होत. त्या सर्व ऋषींमध्यें क्षत्रिय कुळांत जन्मलेला विश्वामित्र हा अधिक पूज्य समजावा लागतो; कारण जो गायत्री मंत्र आम्हां ब्राह्मणांचें सर्वस्व होय, त्या गायत्री मंत्राचा साक्षात्कार पहिल्यानें विश्वामित्र ऋषीस झाला. वसिष्ठासारखे क्षमाशील अनेक ब्रह्मर्षी पूर्वीच्या काळीं होऊन गेले, तरी जो गायत्री मंत्राचा साक्षात्कार त्यांस झाला नाहीं, तो विश्वामित्रासारख्या तापट राजर्षीस झाला, हें जसें विश्वामित्राचें तसें दरोबस्त क्षत्रिय वर्णाचें ध्यानांत वागवण्यासारखें भाग्य होय; कारण जर क्षत्रिय वर्णच नसता किंवा त्यांत कर्मठांच्या इंद्रादिक देवतांस कांपू लावणारा विश्वामित्र जन्मला नसता, तर गायत्री मंत्राचा साक्षात्कार होण्याच्या योग्यतेचा दुसरा पुरुष मिळाला नसता; आणि

जर गायत्री मंत्रच सिद्ध झालेला नाहीं, तर त्या गायत्री मंत्रावर उभारलेली आजच्या आमच्या ब्राह्मणत्वाची इमारत कशी उभारतां येती. याप्रमाणें युगांतरचे दरोबस्त तपोनिष्ठ आणि व्रतनिष्ठ ऋषी पूज्य आणि त्यांच्याहीमध्यें विश्वामित्र विशेष पूज्य ही गोष्ट जशी खरी आहे, तशी त्या युगांतरच्या तपोनिष्ठ आणि व्रतनिष्ठ ऋषींपेक्षां कलियुगांतले ज्ञानेश्वर एकनाथ रामदास तुकाराम यांच्या सारखे भक्तिनिष्ठ संत अधिक पूज्य होत, हीही गोष्ठ खरी आहे; कारण संतांची प्रासादिक सरस्वती शूद्रांच्या किंवा मुसलमानांच्या कानीं पडल्यास ऋषींच्या प्रासादिक सरस्वतीप्रमाणें बाटून ओंवळी न होतां, उलट ज्यांच्या कानीं ती पडते, तेच सोंवळे होतात—मग ते संतांची सरस्वती कानीं पडणारे शूद्र असोत, मुसलमान असोत किंवा मुसलमानांच्याही पलीकडचे कोणी असोत.

एकनाथानें आपल्या भरींव उपदेशास आरंभ केल्यापासून मंडळांतील आध्यात्मिक खातें सुधरत चाललें होतें, तें रामदास आणि तुकाराम यांची भर पडल्यापासून अधिक सुधरलें आणि त्यामुळें ज्ञानेश्वरांच्या पावलांवर पावलें टाकून पूर्वीच्याच वडावर एकनाथानें केलेलें कोंवळें कलम आतां जुनावत चाललें. तरी दर्बारी खात्याचा रोपा जर महायोजकाकडून लावण्यांत आला नसता, तर आध्यात्मिक वटवृक्षाची सावली प्रसंगीं विसांवा खाण्यास मिळावी तितकी मंडळांतील लोकांस मिळाली नसती. पण पूर्वीं उल्लेख केल्याप्रमाणें सत्पुरुषांचे आशीर्वाद आणि वडिलांनीं सांचवलेलें पुण्य या दोहोंचा लाभ मंडळांतल्या आचांडाळ लोकांस झाल्यामुळें, देवाची कृपा त्यांच्यावर विशेष झाली आणि शिवाजीच्या जन्मास सवड सांपडली. शिवाजीची ऐकांतिक निष्ठा देवीच्या पायीं होती.

शिवाजीच्या पिंडांत जसा दर्बारी रक्ताचा एक पाट वहात होता, तसा आध्यात्मिक रक्ताचाही एक पाट वहात होता, म्हणून एके प्रसंगीं आपलें शिरकमळ वाहून मल्लिकार्जुनाची पूजा करण्याची इच्छा शिवाजीकडून प्रदर्शित करण्यांत आली होती. तशांत शिवाजीच्या आंगांत देवी येत असे. तरी जसा दर्बारी पाटाचा जोर शिवाजीच्या रक्तांत होता, तसा आध्यात्मिक पाटाचा नव्हता, हें उघड आहे. तेव्हां दर्बारी रक्त पुष्कळ प्रखर तेजाचें आणि आध्यात्मिक रक्त दर्बारी रक्ताच्या तेजाहून बऱ्याच मंद तेजाचें—अशा दोन प्रकारच्या समतोल रक्तानें शिवाजीची मूर्ती घडण्यांत आली होती. रामदासाच्या रक्तांत जसें आध्यात्मिक रक्ताचें तेज पुष्कळ

जर गायत्री मंत्रच सिद्ध झालेला नाहीं, तर त्या गायत्री मंत्रावर उभारलेली आजच्या आमच्या ब्राह्मणत्वाची इमारत कशी उभारतां येती. याप्रमाणें युगांतरचे दरोबस्त तपोनिष्ठ आणि व्रतनिष्ठ ऋषी पूज्य आणि त्यांच्याहीमध्यें विश्वामित्र विशेष पूज्य ही गोष्ट जशी खरी आहे, तशी त्या युगांतरच्या तपोनिष्ठ आणि व्रतनिष्ठ ऋषींपेक्षां कलियुगांतले ज्ञानेश्वर एकनाथ रामदास तुकाराम यांच्यासारखे भक्तिनिष्ठ संत अधिक पूज्य होत, हीही गोष्ट खरी आहे; कारण संतांची प्रासादिक सरस्वती शूद्रांच्या किंवा मुसलमानांच्या कानीं पडल्यास ऋषींच्या प्रासादिक सरस्वतीप्रमाणें बाटून ओंवळी न होतां, उलट ज्यांच्या कानीं ती पडते, तेच सोंवळे होतात—मग ते संतांची सरस्वती कानीं पडणारे शूद्र असोत, मुसलमान असोत किंवा मुसलमानांच्याही पलीकडचे कोणी असोत.

एकनाथानें आपल्या भरींव उपदेशास आरंभ केल्यापासून मंडळांतील आध्यात्मिक खातें सुधरत चाललें होतें, तें रामदास आणि तुकाराम यांची भर पडल्यापासून अधिक सुधरलें आणि त्यामुळें ज्ञानेश्वरांच्या पावलांवर पावलें टाकून पूर्वीच्याच वडावर एकनाथानें केलेलें कोंवळें कलम आतां जुनावत चाललें. तरी दर्बारी खात्याचा रोपा जर महायोजकाकडून लावण्यांत आला नसता, तर आध्यात्मिक वटवृक्षाची सावली प्रसंगीं विसांवा खाण्यास मिळावी तितकी मंडळांतील लोकांस मिळाली नसती. पण पूर्वीं उल्लेख केल्याप्रमाणें सत्पुरुषांचे आशीर्वाद आणि वडिलांनीं सांचवलेलें पुण्य या दोहोंचाही लाभ मंडळांतल्या आचांडाळ लोकांस झाल्यामुळें, देवाची कृपा त्यांच्यावर विशेष झाली आणि शिवाजीच्या जन्मास सवड सांपडली. शिवाजीची ऐकांतिक निष्ठा देवीच्या पायीं होती.

शिवाजीच्या पिंडांत जसा दर्बारी रक्ताचा एक पाट वहात होता, तसा आध्यात्मिक रक्ताचाही एक पाट वहात होता, म्हणून एके प्रसंगीं आपलें शिरकमळ वाहून मल्लिकार्जुनाची पूजा करण्याची इच्छा शिवाजीकडून प्रदर्शित करण्यांत आली होती. तशांत शिवाजीच्या आंगांत देवी येत असे. तरी जसा दर्बारी पाटाचा जोर शिवाजीच्या रक्तांत होता, तसा आध्यात्मिक पाटाचा नव्हता हें उघड आहे. तेव्हां दर्बारी रक्त पुष्कळ प्रखर तेजाचें आणि आध्यात्मिक रक्त दर्बारी रक्ताच्या तेजाहून बऱ्याच मंद तेजाचें—अशा दोन प्रकारच्या समतोल रक्तानें शिवाजीची मूर्ती घडण्यांत आली होती. रामदासाच्या रक्तांत जसें आध्यात्मिक रक्ताचें तेज पुष्कळ प्रखर होतें, तसें दर्बारी रक्ताचें तेज बरेंच मंद होतें. अर्थातच रामदासाच्या रक्ताच्या समतोलपणाची

दिशा निराळी आणि शिवाजीच्या रक्ताच्या समतोलपणाची दिशा निराळी. ज्याप्रमाणें पिंड घडला जातो तेव्हां समतोलपणांत पित्ताचा अंश जास्त झाला, म्हणजे पुरुषाची पित्तप्रकृती होते किंवा कफाचा अंश जास्त झाला म्हणजे कफप्रकृती होते, त्याप्रमाणें समतोलपणांत दर्बारी रक्ताचा अंश वरचढ झाल्यामुळें शिवाजी या काळीं दर्बारी-प्रकृती होऊन मराठी मंडळाचा दर्बारी पुढारी होऊं शकला आणि समतोलपणांत आध्यात्मिक रक्ताचा अंश वरचढ झाल्यामुळें रामदास आध्यात्मिकप्रकृती होऊन मंडळाचा आध्यात्मिक पुढारी होऊं शकला. या काळच्या चौकडींतील राहिलेल्या तिघांच्या पिंडांत—जसा ज्ञानेश्वरांच्या आणि एकनाथाच्या पिंडांत तसाच—एका निर्भेळ आध्यात्मिक रक्ताचा पाट वहात सुटला होता.

"तत्सवितु" या क्षत्रिय कुळांतल्या विश्वामित्र ऋषीच्या संस्कृत भाषेंतील त्रिपदा गायत्रीच्या अर्थाचा खुलासा करण्याचा आजचा प्रसंग नाहीं, तर "मराठा तितका मेळवावा । महाराष्ट्रधर्म वाढवावा" या ब्राह्मण कुळांतल्या रामदास नांवाच्या "समर्थ" संतांच्या मराठी भाषेंतल्या चतुष्पदा गायत्रीच्या अर्थाचा खुलासा करण्याचा आजचा प्रसंग आहे ; कारण गायत्री वृत्तांतली विश्वामित्री त्रिपदा गायत्री आजच्या श्रोतेमंडळीमध्यें एखादा शूद्र असल्यास कर्मठांच्या दृष्टीनें ओंवळी होण्याचा संभव असून, ओंवीवृत्तांतली रामदासी चतुष्पदा गायत्री शूद्राच्याही पलीकडचा कोणी श्रोतेमंडळींत असल्यास तो सोंवळा करण्याचें सामर्थ्य "समर्था"च्या योगानें आलेली अशी—जशी अकर्मठांच्या तशी कर्मठांच्याही दृष्टीनें आहे.

"मराठा तितुका मेळवावा" या स्थळीं मराठा" शब्द मुसलमानांस लागू होतो कीं नाहीं ? शिवाजीचा अवतार शेंडीचा अभिमान राखून निशेंड्यांच्या निसंतानासाठीं होता; अशा समजुतीनें कित्येक कर्मठांस "मराठा" शब्दाचा अर्थ अधिक व्यापक करून मुसलमानांस आंत ओढणें पसंत पडणार नाहीं. जर शिवाजीचा अवतार शेंडीचा अभिमान राखून निशेंड्यांच्या निसंतानासाठीं होता, असें सिद्ध करतां येईल, तर सुरेख होईल. जर या काळचे शेंडी राखणारे निशेंड्यांस किंवा निशेंड्ये शेंडी राखणारांस पाण्यांत पहाणारे असते, तर शिवाजीचा अवतार निशेंड्यांच्या निसंतानासाठीं होता, असें म्हणण्यास सवड सांपडती. पण इतिहासांतल्या गोष्टींचा विचार करतां जसा मराठी मंडळांतल्या तलवारबहादुर क्षत्रियांचा तसाच कलमबहादुर ब्राह्मणांचा मुसलमानांवर आणि मुसलमानांचाही या द्विवर्ग बहादुरांवर लोभ पुष्कळ होता. मालोजीस शहा सरीफ नांवाच्या यवन साधूचा आशीर्वाद मिळाला आणि त्यामुळें दीपाबाईनें एका मुलाचें नांव शहाजी आणि दुसऱ्या मुलाचें नांव सरफजी ठेवलें. शहाजीनें निझामशा-

ठाणे.



ह्यांच्या जीर्णोद्धारार्थ भगीरथ प्रयत्न केले. निझामशाही हबशी बापलेक बुडवतात असें पाहून शहाजीनें बुडणाऱ्या निझामशाहीसाठीं कंबर बांधावी, इतका निझामशाहीवर एकंदरींत या काळच्या मराठी हिंदूंचा लोभ होता. पुढें निझामशाही बुडाली तेव्हां मुरारपंत नांवाचा कलमबहादुर ब्राह्मण अदिलशाहीचा कुल्कारभारी होता त्याच्या मार्फत तलवारबहादुर शहाजी त्या काळच्या अदिलशहाच्या पदरीं राहिला. मुसलमानी अदिलशाहीचें सूत्र मुरारपंत नांवाच्या मराठी ब्राह्मणांच्या हातीं यावें इतका मुसलमानांचा लोभ या काळीं मराठी हिंदूंवर होता. याप्रमाणें जर परस्पर लोभाचा पुरावा इतिहासांत उघड आहे, तर शिवाजीचा अवतार शेंडीचा अभिमान राखून निशेंड्यांच्या निसंतानासाठीं होता, असें ह्मणतां येईल काय? जर शेंड्या तितका पदरीं ठेवावा आणि निशेंड्या तितका हांकवून टाकावा, असा या गायत्रीचा अर्थ रामदासानें शिवाजीच्या कानीं फुंकला असता, तर शिवाजीची प्रवृत्ति निभ्रांत तशी झाली असती. पण शिवाजीची मूर्ती शेंड्या जितका सांपडेल तितका पदरीं ठेवून, निशेंड्या बिलकुल पदरीं ठेवीत नसे, असें ह्मणतां येईल काय? छत्रसाल बुंदेले अवरंगझेबाची नोकरी सोडून आला आणि शिवाजीच्या पदरीं रहाण्याची खटपट करूं लागला. विजापुरकराच्या पदरच्या निशेंड्यांच्या कित्येक पतकांनीं एकदा शिवाजीच्या पदरीं रहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. शेंडी राखणाऱ्या छत्रसालाचा मनोरथ पूर्ण न करितां, विजापुरच्या निशेंड्यांचा मनोरथ शिवाजीनें आईची मसलत घेऊन पूर्ण केला. इतिहासांतली स्थिति अशा प्रकारची असल्यामुळें, "मराठा" शब्द निशेंड्यांस न लावण्याविषयीं शिवाजीचे कान रामदासानें फुंकले होते, अशी कल्पना करण्यास सवड नाहीं. जर "मराठा" शब्द निशेंड्यांस न लावण्याविषयीं रामदासाचा दुराग्रह दिसत नाहीं आणि जर शिवाजीनेंही सगळ्या शेंड्यांस पदरीं न ठेवतां कित्येक निशेंड्यांसही पदरीं ठेवलें, तर शिवाजीचा अवतार निशेंड्यांच्या निसंतानाविषयीं उघड नव्हता. ज्या धर्मासाठीं शिवाजीचा अवतार झाला तो धर्म कर्मठांचा कोता धर्म नव्हे, तर ज्ञानेश्वरांनीं जीर्णोद्धार केलेला संतांचा विशाळ धर्म होय. रामदासाच्या किंवा तुकारामाच्या भक्तिरसानें थबथबलेल्या कीर्तनांत किंवा भजनांत शिवाजी विसांवा घेई असें ह्मणण्यास आधार आहे; गागाभटानें सोडलेल्या कर्मकांडाच्या कथेंत किंवा अश्वमेधाच्या आणि राजसूयाच्या खटपटींत शिवाजी विसांवा हुडकीत बसे, असे ह्मणण्यास आधार नाहीं. एकदां गागाभटास घेऊन शिवाजीची स्वारी संतमंडळींत घुसली आणि गागाभटानें जसा कीर्तनाच्या तसा भजनाच्या किंवा भगवंताच्या गुणानुवादाच्या मार्गास वेदाचा आधार नाहीं, अशी लटपटांची चालवली.

तुकाराम वगैरे मंडळी कर्मठांच्या दृष्टीनें मुळचीच वेदाक्षराची अनधिकारी पडली. रामदास जरी ब्राह्मण होता, तरी लग्नाच्या पूर्वी १५ किंवा १६ वर्षांचा असतांच पळाल्यामुळें त्याचा वेदाक्षराशीं किंवा मीमांसादिक शास्त्रांशीं सांगण्यासारखा प्रसंग पडलेला असण्याचा संभव नव्हता. त्यामुळें गागाभटास वाटलें कीं संधि चांगली सांपडली. वामनपंडित हा असला प्रसंग कोसळल्यास प्रतिज्ञानेश्वर किंवा प्रतिएकनाथ होता हें गागाभटास माहीत नव्हतें. भवति न भवतीचा प्रसंग दिसतांच वामनाची मूर्ती पुढें सरासवली आणि समर्पक जवाब मिळतांच गागाभटाचें तोंड बंद झालें. अशी स्थिती ज्यापक्षीं होती आणि शेखमहंमदासारखा मुसलमानही मराठी धर्मांत उघड शिरूं शकला होता, त्यापक्षीं " मराठा" शब्दाचा अर्थ मराठी ज्याची जन्मभाषा तो आणि " महाराष्ट्र " धर्म ह्मणजे ज्यांत मुसलमानाचाही समावेश सहज होऊं शकतो तो ज्ञानेश्वरांनीं जीर्णोद्धार केलेला भागवती धर्म, असें समजल्याविना गती नाहीं. असे मुख्य अर्थ ठरले, ह्मणजे जसा प्रसंगीं मराठी बोली समजून किंवा न समजूनही कोणत्या तरी प्रकारें मंडळाची सेवा करणाऱ्या मुसलमानांस तसा संध्यावैश्वदेवाचे किंवा व्रताचे प्रसंगीं मराठी भाषेचा तिरस्कार करणाऱ्या कर्मठासही उद्देशून " मराठा " शब्दाचा आणि दुराग्रह सोडलेल्या कोणत्याही विधर्मी पुरुषाच्या धर्मास उद्देशून " महाराष्ट्र धर्म " शब्दाचा गौण प्रयोग करतां येईल. याप्रमाणें संतमंडळीच्या अनुग्रहानें जसा " मराठा " शब्दास तसा " मराठी धर्म " याही शब्दास अतिशयच व्यापकपणा आला आहे.

मराठी मंडळांतील हवा अशी दिसते कीं ती कर्मठांच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही धर्मास एकंदरींत मानवत नाहीं आणि जमीनही अशी दिसते कीं कर्मठांचा किंवा दुसरा कोणताही धर्म एकंदरींत तींत सांगण्यासारखीं खोल मुळें धरूं शकत नाहीं. ही हवा एकंदरींत नीट मानवते एका मराठी धर्मास आणि या जमिनींत एकंदरींत खोल मुळें धरूं शकतो एक मराठी धर्म. जसे कोकणस्थ क्षत्रियांपेक्षां देशस्थ क्षत्रिय एकंदरींत थोर मनाचे आणि उदार दिलाचे असतात, तसे कोकणस्थ ब्राह्मणांपेक्षां—मग ते कोकणस्थ ब्राम्हण चित्पावन असोत, कऱ्हाडे असोत, कुडाळे असोत किंवा शेणवी असोत—देशस्थ ब्राह्मण एकंदरींत थोर मनाचे आणि उदार दिलाचे असतात. देवगडाच्या दक्षिणची व विशेषें करून वाडी प्रांताची आध्यात्मिक हवा सोहिरोबासारखा सत्पुरुष जन्मल्यामुळें जरी पूर्वीं पासून पुष्कळ अंशीं समतोल राहिली आहे आणि जरी या मराठी समतोलपणामुळें कोकणपट्टींतल्याच पूर्वींच्या थोर मनाच्या ब्राम्हणांनीं देखील " श्रीगणेशाय नमः " या कित्त्यानंतर " ओ नामा

सोधम् " हा बौद्धांचा किंवा जैनांचा किस्ता कायम केला तो अजूनही गांवढ्यांतून फडकत आहे. तरी कोकणांत व विशेषें करून देवगडाच्या उत्तरेस जसा पुरुषांचा तसा बायकांचा धर्म वर्तमान काळीं एकंदरींत फक्त सोंवळ्याओंवळ्यामध्यें किंवा शिवाशिवीमध्यें आणि एकमेकापासून दूरदूर रहाण्यामध्यें संपतोसा पुष्कळांस भास होतो. एकदा घाट चढून देशावरच्या खुल्या मुलुखांत गेलें कीं कोकणची कोंडलेली हवा सुटली आणि देशावरची खुली हवा आंगीं खेळूं लागली. राव बाजी हा मुळचा देवगडच्या उत्तरेस जन्मलेल्या कोकणस्थ ब्राह्मणांपैकीं, अर्थातच कोंडलेल्या हवेंतला. पण देशावरची खुली हवा आंगीं खेळूं लागली आणि त्यामुळें यवन नाटकशाळेपासून झालेल्या आपल्या समशेरबहादुर नांवाच्या मुलाची मुंज करण्याचें वारें रावबाजीच्या आंगीं भरलें. जर देशावरची हवा आंगीं अधिक खेळलेली असती, तर रावबाजी कर्मठांस थोडें तरी पाऊल पुढें टाकूं लावता. पण रावबाजीस खुली हवा नुक्तीच मिळालेली असल्यामुळें, वारें भरलें तें विशेष जोराचें भरलें नाहीं. सारांश— जरी अखेरीस समशेरबहादुराची मुंज झाली नाहीं, तरी रावबाजीस मराठी धर्माची दिशा उघड दिसली, या विषयीं शंका रहात नाहीं. रावबाजीचा मुलगा नानासाहेब यानेंही मराठी ब्राह्मणांस एकवटण्याच्या स्तुत्य उद्देशानें निरनिराळ्या पोटभेदांतल्या बायका केल्या आणि मराठी धर्माच्या दिशेकडे आपलें पाऊल पडत आहे, हें दाखविलें. पाणिपतच्या तुंबळ लढाईत इब्राहिम मुसलमानानें जी ब्रह्मबादशाहीची नोकरी इमानानें केली, ती मराठी धर्माकडेसच दृष्टी पोंचवून केली. या प्रसंगीं अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला हाही " मराठा " झाला आणि " महाराष्ट्र " धर्मांत आला. या मराठी धर्माकडे दृष्टी पोंचून, सेनापतीचें पद माधवरावाकडून मुरारराव घोरपड्यास देण्यांत आलें आणि सगळी घरफूट बंद पडून महाराष्ट्र धर्माचा जोर वाढणार असा रंग दिसूं लागला. माधवरावाची दृष्टी मराठी धर्माकडे पोंचली, ती न्यायमूर्ती रामशास्त्र्यामुळें पोंचलेली दिसते. कर्मठपणा न सोडतांही ज्याची दृष्टि सर्वांशीं मराठी धर्माकडे पोंचली असला रामशास्त्र्यासारखा ऐतिहासिक पुरुष रामशास्त्रीच. रामशास्त्र्यासारखें रत्न या काळीं पेशवाईस मिळालें, हें पेशवाईचें मोठें भाग्य होय. पण या रत्नाचा रत्नपारखी मराठी मंडळाच्या दुर्दैवानें वारला आणि नारायणरावाच्या खुनानंतर रामशास्त्र्यानें कृष्णेच्या तीरीं वास स्वीकारून राहिलेला आयुर्दाव स्नानसंध्येंत घालविला. याच मराठी धर्माचा आदर करून महादजी शिंद्यानें जसा जिवबा दादा शेणव्यास तसा राणेखानासही आश्रय दिला आणि गोसांव्यांचीं कांहीं पतकें पदरीं ठेवून लश्करांत अनेक सुधारणा देशकालवर्तमानाकडे लक्ष पोंचवून केल्या. याच मराठी धर्माकडे लक्ष

पोंचल्यामुळें, जरी दुःखाचे डोंगरावर डोंगर कोसळले तरी जशी वृद्ध सासऱ्याकडे तशी मंडळाकडेही दृष्टि पोंचवून, अहिल्याबाईनें सती न जातां आपलें वैधव्य सफळ केलें आणि मंडळांतल्या दरोबस्त जातींच्या बायकांस एक अति उत्तम उदाहरण घालून ठेवलें. मंडळांतील फूट न वाढतां या मराठी धर्माकडे लक्ष पोंचावें, ह्मणून स्वधर्माचा आदर करून यशवंतरावानें पुढें ठाकलेलीं गोरींही पलटणें त्यांच्या कामगारांनिशीं लीलेनें कापून काढलीं आणि पुण्याच्या लढाईची मात्रा बाजीरावास दिली. वैद्यानें आपली शिकस्त केली; पण मंडळाच्या दुर्दैवानें बाजीरावाचा ज्वर शांत न होतां उलट जोरावला आणि या स्वधर्माचा त्याग करणाऱ्या दुखणेकऱ्यास यथायोग्य फळ मिळून, "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" या भगवद्गीतेंतील भागवती वचनाची सत्यता सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आली. जोंपर्यंत जीर्णोद्धार केलेल्या भागवती धर्माचा पगडा वर असून, कर्मठांची बुद्धि तो आपला यजमान समजते आणि एखाद्या कुलीन स्त्रीप्रमाणें आपली मर्यादा ओलांडीत नाहीं, तोंपर्यंत मराठी मंडळांतली हवा समतोल असते आणि ती समतोल असल्यानें लोकांचीही प्रकृति निकोप रहाते. पण कुलीन स्त्रीनें एकदा मर्यादा ओलांडिली आणि यजमानाचा अधिकार बळकावण्याची दिशा जोरानें धरली, ह्मणजे शेवट कडू होतो आणि घर बुडतें. शिवाजीचे कारकीर्दीत आध्यात्मिक हवा समतोल होती, ह्मणून स्वराज्याचा मजबूत पाया पुनः एकदा पडूं शकला; पुढें राजारामाच्या कारकीर्दीत हवेच्या समतोलपणांत बिघाड झाला नाहीं, ह्मणून मनोरथ पूर्ण होण्याची दिशा न दिसतां, दिल्लीपतीस या लोकाचा त्याग करावा लागला. पुढें आध्यात्मिक हवेचा समतोलपणा जोंपर्यंत कायम होता, तोंपर्यंत स्थिती एकंदरींत बरी होती; पण माधवरावाच्या पश्चात् समतोलपणांत विशेष बिघाड होत चालला आणि त्यामुळें जी उतरती कळा लागली तिची पराकाष्ठा खडकीच्या लढाईत होऊन ब्रह्मबादशाही नुसत्या कागदावर राहिली.

आतां ही सृष्टी देवानें केलेली कीं अनादि—या राहिलेल्या बऱ्याच महत्वाच्या मुद्याचा थोडा विचार झाला, ह्मणजे मराठी धर्माच्या स्वरूपाचें एकंदरींत दिग्दर्शन झालें.

कधीं कधीं देवाच्या कर्तृत्वाचा उल्लेख संतमंडळीच्या सरस्वतींत निभ्रांत येतो. असल्या स्थळीं अगदीं पहिल्या जन्मीं प्राण्यास पूर्वसंचित उघड नाहीं, तरी पुढची सगळी जबाबदारी ज्याची त्याच्यावरच एकंदरींत समजली जाते; कारण अंतर्यामी देवता नांवाचें आपलें प्रतिबिंब जीवात्म्यास बऱ्यावाइटाचा मार्ग दाखवण्यासाठीं ह्मणून देवानें प्रत्येकाच्या हृदयांत पाडलेलें असतें, असा एक मुख्य सिद्धांत आहे. अर्थातच

प्राण्याची अगदीं पहिली प्रवृत्ति स्वतंत्र असते. या संप्रदायाप्रमाणें सृष्टि सादि ठरून, जीवात्मा अंतर्यामी देवता आणि जड भूतें असे सृष्टीचे तीन प्रकार होऊं पहातात. दुसरा संप्रदाय सृष्टी अनादि समजतो. या संप्रदायाप्रमाणें जसा परमात्म्यास कर्ता नाहीं, तसा वरील त्रिविध सृष्टीसही नाहीं आणि अर्थातच अगदीं पहिली प्रवृत्ति नाहीं. या संप्रदायाप्रमाणें परम कारुणिकपणानें भरलेल्या परमात्म्याची प्रवृत्ति केवळ परार्थ असून, तींत कोणत्याही प्रकारचा स्वार्थ नसतो आणि त्यामुळें प्रत्येक जीवात्म्याचें जन्मोजन्मीं कल्याण होत जाऊन अखेरीस त्याचा आपल्या आत्म्यामध्यें बेमालूम मिलाफ होऊन जावा अशा धोरणानें सगळी योजना हळूहळू परमात्म्याकडून चाललेली असते; इतकेंच कीं परमात्मा सर्वज्ञ असल्यामुळें आणि जीवात्मा अल्पज्ञ असल्यामुळें परमात्म्याचें धोरण जीवात्म्यास नसतें आणि तेणेंकरून परमात्म्यास दोष जीवात्म्याकडून अनेक प्रसंगीं उगाच लावण्यांत येतो. यासाठीं अल्पज्ञ जीवात्म्यानें सर्वज्ञ आणि परम कारुणिक अशा परमात्म्यावर आपला सगळा भार टाकून, "या प्रभुच्या चित्तींचें करणें कोणी कधींहि जाणेना । जाणों जातां कविही भ्रमले निश्चय तयांसि बाणेना" अशी खरी हकीकत आहे, "तस्मात् सुखदुःखादिक हें सर्वहि होय ईश्वराधीन । जाणुनि असा करावा निश्चय कीं तत्प्रसाद साधीन; व्हावें अनुवर्ती या प्रभुचें याचि प्रभूतमा गावें, स्वामी प्रभुजी पाळा प्रजा अनाथा असेंचि मागावें"—अशी वृत्ति संसारांत निरंतर ठेवण्याविषयीं या संप्रदायांतल्या कवींचा प्रत्येक मानवी प्राण्यास उपदेश असतो. परम कारुणिकपणामुळेंच प्रसंगीं अवताराचेही क्लेश परमात्मा सोसतो. कित्येक अवतार नरसिंहासारखे उग्र असतात, कित्येक शंकराचार्यांसारखे किंवा ज्ञानेश्वरांसारखे शांत असतात, कित्येक कृष्णासारखे किंवा शिवाजीसारखे उग्रशांत असतात. कित्येक अवतारांमध्यें कळा कमी असतात, कित्येकांमध्यें जास्त असतात. परमात्म्याचा पूर्ण अवतार एकंदरींत शक्य नाहीं. कृष्ण हा पूर्णावतार असा साधारणतः लोकांचा ग्रह आहे, पण तो निराधार दिसतो. एकदा मृत्तिकाभक्षणाचे प्रसंगीं, एकदा शिष्टाईचे प्रसंगीं आणि एकदा भगवद्गीतेचे प्रसंगीं—मिळून तीन प्रसंगीं कृष्णानें आपल्या विश्वरूपाचा मासला यशोदेपुढें कौरवांपुढें आणि अर्जुनापुढें मांडला होता. या तीन प्रसंगांवरून कृष्णामध्यें अवतारी कळा कमजास्त होत असे, असें म्हणावें लागतें; आणि कळा कमजास्त होते असें म्हटलें म्हणजे अवतारांचें लोकांनीं कल्पिलेलें पूर्णत्व मावळलें. तरी उंचनीच कुळांमध्यें जे पूर्वी अनेक अवतार होऊन गेले, त्यांची माळ केल्यास गवळ्यांच्या कुळांत जन्मलेला कृष्ण हाच एक मेरूच्या ठिकाणीं शोभण्यासारखा आहे. जशी भूपृष्ठाची, तशीच भूपृष्ठावरील लोकांची ठेवण दिसते; अर्थातच

जसा भूपृष्ठावर उंचनीचपणा दृष्टीस पडतो, तसा भूपृष्ठावरील लोकांमध्येही नजरेस पडतो. सर्वांची संपन्नता जर उघड सारखी नाहीं, तर सर्वांचे अधिकारही उघड सारखे नाहींत; जर सर्वांचे अधिकार उघड सारखे नाहींत, तर आपणांमध्यें मानवी सृष्टीचा बेमालूम मिलाफ होऊन जाण्यासाठीं जे परम कारुणिक परमात्म्याचे यत्न एकसारखे चाललेले असतात ते सगळे एकाच प्रकारचे असण्याचा उघड संभव नाहीं. सारांश—मानवी सृष्टीमध्यें सर्वांचे कित्येक हक्क जरी सारखे असले, तरी सगळेच हक्क सारखे मानतां येत नाहींत. ज्यांची संपन्नता विशेष असते आणि संपन्नतेमुळें अधिकारही विशेष असतो, ते अवतारी पुरुष किंवा परमात्म्याच्या विभूती किर-कोळांनीं सर्व प्रकारें वंद्य मानल्या पाहिजेत. हा वंद्यपणा एकदा कबूल केला, म्हणजे अवतारी पुरुषाची सरस्वतीही वंद्य झाली आणि तसि किरकोळांच्या सरस्वती-पेक्षां अधिक मातब्बरी देवाचे घरीं आली. ज्ञानेश्वरांची किंवा तुकारामाची सरस्वती जे आमच्यातुमच्यासारखी समजत असतील, त्यांनीं कितीही वल्गना केल्या तरी लोको-त्तर लीनता आंगीं आणून अहंकारास पिटाळून लावणाऱ्या भक्तीच्या गांवाची वाट त्यांस स्वप्नींही दिसलेली असण्याचा संभव नाहीं. जर लीनता आंगीं नाहीं, जर अहंकार इतका माजलेला कीं डोळ्यावर काळोखी येऊन वंद्यही अवंद्य भासतो आणि वडीलही निंद्य वाटतो, तर भगवद्भक्त तुकारामानें "पोटासाठीं केलें ढोंग। तेथें कैंचा पांडुरंग" असा जो अस-ल्या मंडळीस उद्देशून गजर केला आहे, तोच बरोबर आहे. असल्यांचा मुख्य धर्म काय तो पांडुरंगाच्या रामाच्या किंवा कृष्णाच्या नांवाचा द्वेष करणें आणि अवतारांची टर उडवणें. असली जी आंतून किंवा बाहेरून नास्तिक बनलेली मंडळी आहे, तिचीही वृत्ती या जन्मीं नाहीं तर पुढच्या जन्मीं परम कारुणिक देवाच्या निरंतर चाललेल्या श्रमांनीं उजळेल आणि ती एकदा उजळली ह्मणजे मनाचा ओघ आपोआप देवाकडे वळून, देवामध्यें बेमालूम मिलाफ होऊन जाण्याची सवड सांप-डण्यापुरतें या निंदक आणि द्वेष्ट्या मंडळीचें भाग्य उघडेल, इतकी योजना परम कारु-णिक महायोजकानें करून ठेविली आहे, असें उदयनाचार्य ह्मणतात. याप्रमाणें सृष्टी अनादि मानून, "जसा या भूपृष्ठावरील बाहेरचा काळोख स्वतः घालवून, दुसऱ्या पृष्ठावरील बाहेरचा काळोख घालवण्यासाठीं प्रस्थान ठेवतो तेव्हां या पृष्ठावर बाहेरच्या काळोखाचा अंमल बसूं नये ह्मणून आपल्या शक्तीचा अंश अग्नि आणि चंद्र या दोन प्रतिनिधींच्या हवालीं करतो, तसा या पृष्ठावरील आंतला काळोख घालवण्यासाठीं स्वतः अवतार घेऊन, दुसऱ्या पृष्ठावरील आंतला काळोख घालवण्यासाठीं जातो तेव्हां पूर्वींच्या पृष्ठीं आंतल्या काळोखाचा अंमल बसूं नये ह्मणून आपल्या कळेचें वारें आंगीं

खेळणाऱ्या संतांस जन्मास घालतो "—मिळून बाहेरचा काळोख घालवण्याची परार्थ कामगिरी जशी सूर्याची समजतात, तशी आंतला काळोख घालवण्याची परार्थ कामगिरी परमात्म्याची समजावी, अशी जी दिशा या संप्रदायांतल्या मोरोपंतानें दाखवली आहे, तीच उत्तमोत्तम दिसते.

## ३ मराठी मंडळांतली आजची दर्बारी आणि आध्यात्मिक हवा.

शालि० च्या तेराव्या शतकांत देवगिरीची जाधवी बुडाली आणि पुढें कांहीं वर्षांनीं मुसलमानीची स्थापना झाली. मराठी मंडळांतली निझामशाही बुडाल्यानंतर, तेलंगी कुतुबशाही आणि कानडी अदिलशाही यांच्या सावली खालीं मराठी मंडळांत शिवाजीनें भोसलेशाहीची स्थापना केली. पुढें शाहू छत्रपतीच्या पश्चात् नानासाहेबानें पुणें मुक्कामीं पेशवाई स्थापन केली आणि या पेशवाईत भोसलेशाही सामील झाल्यासारखी झाली. शा० च्या सोळाव्या आणि सत्राव्या शतकामध्यें मिळून एकंदरींत जी मराठी लोकांची फत्ते झाली तिच्या आठवणीपुढें पूर्वीच्या तेराव्या शतकांतल्या फत्तेची आठवण—जशी मशालीच्या जोतीपुढें दिवटीची जोत तशी—फिक्की पडली. खडकीच्या लढाईत पेशवाई आटपल्यानंतर इंग्रजी झाली.

आजही इंग्रजीच आहे. मराठ्यांसारखे एकंदरींत थोर मनाचे आणि विशाळ दृष्टीचे लोक जर कोणांच्या तरी अंमलाखालीं असलेच पाहिजेत, तर ते इंग्रजांसारख्या थोर मनाच्या आणि विशाळ दृष्टीच्या अंमलाखालीं असावे, हें अत्युत्तम. इंग्रज जसे धर्मानें ख्रिस्ती आहेत, तसे मराठी लोक धर्मानें हिंदु आहेत. इंग्रज लोकांचा ख्रिस्ती धर्म इतर ख्रिस्ती लोकांच्या धर्माहून निराळा आहे आणि मराठी लोकांचाही हिंदु धर्म इतर हिंदु लोकांच्या धर्मापासून निराळा आहे. इंग्रजी देशी धर्माचा पाया मृत भाषेंतील बैबल नव्हे, तर जिवंत देशी भाषेंतील बैबल होय; याचप्रमाणें मराठी देशी धर्माचा पाया मृत भाषेंतील भगवद्गीता नव्हे, तर जिवंत भाषेंतील ज्ञानेश्वरी होय. मुळच्या बैबलांतील दिशा कोणतीही असो, जी दिशा इंग्रजी बैबलानें एकदां दाखवली, तीच दिशा आजच्या इंग्रजी धर्माची आहे; त्याप्रमाणें मुळच्या भगवद्गीतेची दिशा कोणतीही असो—ज्ञानेश्वरीनें जी दिशा एकदां दाखवली, तीच दिशा आजच्या मराठी धर्माची आहे. इंग्रजांतल्या बऱ्या बऱ्या सर्दारांनीं कंबर बांधून गरीब लोकांस त्या त्या प्रसंगीं दर्बारी जुलुमांतून मुक्त केलें. महाराष्ट्रांतल्या ब्रह्मबीजी पुरुषांनींही धर्मचिंतामणीचा लाभ होऊन कुळंबी माळी महार वगैरे अक्षरशून्य लोकांची आध्यात्मिक दृष्टी उजळावी म्हणून देशी भाषेमध्यें अनेक बाळबोध ग्रंथ रचण्यांत आपली

" अमोल काया " खर्चली आणि प्रसंगीं आपल्याच जातीच्या लोकांनीं केलेला छळ सोसला. आंग्ल मंडळांत दर्बारी जुलुमाचा तिटकारा मणगटाच्या जोरावर करणारी मंडळी पूर्वी जशी किरकोळ लोकांमध्यें तशीच बड्या लोकांमध्यें होऊन गेली आणि आजही तसली द्विवर्ग मंडळी हजर आहे; त्याप्रमाणें मराठी मंडळांत आध्यात्मिक जुलुमाचा तिटकारा मणगटाच्या जोरावर करणारी मंडळी जशी ब्राह्मणेतरांमध्यें तशीच ब्राह्मणांमध्यें पूर्वीच्या काळीं होऊन गेली आणि आजही तसली द्विवर्ग मंडळी हजर आहे. इंग्रजांमध्यें सवड सांपडतांच दिगंतींही फांकण्याची तयारी असते. संधीमात्र आली पाहिजे; ती एकदांची आली, कीं मराठ्यांच्या वसाहती दूरदूर झाल्या.

याप्रमाणें मराठ्यांमध्यें आणि इंग्रजांमध्यें जरी सारखेपणा पुष्कळ आहे, तरी फरकही बराच आहे. इंग्रजी धर्मात बराच कोतेपणा आहे, मराठी धर्माचा थोरपणा उघड नाहीं. जो कोणी ख्रिस्तास अगदीं पूर्ण अवतार आणि बेबल एवढाच काय तो ईश्वरप्रणीत ग्रंथ समजेल, त्याला मात्र देवाच्या कृपेचा दरवाजा उघडेल. पण जर ख्रिस्ताचा अवतार पूर्ण मानला नाहीं किंवा महंमदाचाही अवतार पूर्ण मानला, जर कां बैबलाप्रमाणें कुराणही ईश्वरप्रणीत मानलें, तर देवाच्या कृपेचा दरवाजा यावच्चंद्रदिवाकर बंदचा बंद राहिला— हा इंग्रजी धर्माचा निव्वळ कोतेपणा होय. अनन्यभावें शरण जाऊन जो देवाची भक्ती आवडीनें करूं लागला—मग आवडतें ध्यान निर्गुणाचें असो कीं सगुणाचें असो आणि भक्त रहीमास मानो कीं रामास मानो व कुराण ईश्वरप्रणीत समजो अगर ज्ञानेश्वरी ईश्वरप्रणीत समजो-तो तरला, या मोठ्या सिद्धांतावरून मराठी धर्माचें पाऊल किती पुढें गेलें आहे, तें लागलेंच लक्षांत येतें. याप्रमाणें जरी मराठी धर्माचें पाऊल इंग्रजी धर्माच्या पुष्कळ पुढें पडलेलें आहे, तरी आध्यात्मिक खातें बेशिस्त असल्यामुळें दर्बारी खात्यांतील एकसूत्रीपणा त्यांत राहिला नाहीं आणि तेणेंकरून मराठी धर्माची बाहेरची स्थिती जशी दृष्टीस पडावी होती तशी आज मितीस दृष्टीस पडत नाहीं. जर दर्बारी शिस्त आणि दर्बारी एकसूत्रीपणा आध्यात्मिक खात्यांत शिरलेला असता, तर दर्बारी सत्तेंतली चलबिचल आध्यात्मिक सत्तेस सांगण्यासारखी न भोंवती. इंग्रजी मंडळांत जशी दर्बारी खात्यांत शिस्त आहे तशीच आध्यात्मिक खात्यांत असून, जसा दर्बारी खात्यांत एकसूत्रीपणा आहे तसाच आध्यात्मिक खात्यांत आहे; इतकेंच नाहीं, तर आध्यात्मिक सूत्रही सर्वेवटीं राजसूत्रांत गोंवून ठेवलेलें असल्यामुळें, आध्यात्मिक माळ आणि दर्बारी माळ मिळून जी मंडळांतल्या दरोबस्त लहानमोठ्या कारभाऱ्यांची बडी माळ होते, ती एकाच दर्बारी मेरूच्या भोंवती फिरते. सारांश—इंग्रजी मंडळाचा घाट आणि मराठी मंडळाचा घाट या दोहोंमध्यें सारखेपणा जरी बराच असला, तरी फरकही बराच आहे.

इंग्रज लोक एकंदरींत मनानें थोर आहेत आणि रिपनसारखी सर्दार मंडळी त्यांच्यामध्यें हमेश हयात असते, हें एक चांगलें लक्षण आहे. दादाभाई नौरोजी हे सद्गृहस्थ प्रतिनिधींच्या सभेचे सभासद होऊं शकले आणि दिवाणी खात्यांतील सनदी नोकरांची परीक्षा हिंदुस्थानांतही प्रतिवर्षी घेऊं लागावें अशी सूचना प्रतिनिधींच्या सभेंत मंजूर होऊं शकली; इतकेंच नाहीं, तर देशी लोकांची खरी कळकळ बाळगणाऱ्या आणि गांजलेल्या लोकांची दाद लागावी या हेतूनें दीर्घोद्योग स्वतः करून उत्तम उदाहरण घालून देणाऱ्या ह्यूम साहेबांसारख्या विभूतीही इंग्रज लोकांमध्यें जन्मास येत असतात. हा सगळी सामग्री एकंदरींत सर्वा हिंदूंच्या आणि विशेषें करून मराठी लोकांच्या तोंडावर तजेला आणणारी अशी देवाच्या कृपेनें मिळाली आहे. तर तेराव्या शतकाची आठवण जशी सोळाव्या आणि सत्राव्या शतकानें नाहींशी केली, तशी सोळाव्या आणि सत्राव्या शतकाची आठवण हें शालिवाहनाचें एकोणिसावें शतक नाहींशी करील, अशी भरपूर उमेद आहे. जर आजचे मराठी लोक पूर्वींच्या मराठी लोकांचे वंशज खरे, तर त्यांचें पाऊल—जरी हळू हळू तरी—दमानें एकंदरींत पुढें पडल्याशिवाय रहाणें नाहीं, आणि आपण लावलेला शिक्षणाचा वृक्ष बाजूं लागला असें दृष्टीस पडलें, म्हणजे आजचे इंग्रज लोकही—जर ते पूर्वींच्या इंग्रजांचे वंशज खरे तर—मराठी लोकांचे आणि त्यांच्याबरोबर अधिकार आलेल्या दुसऱ्याही देशी लोकांचे वाजवी मनोरथ पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहींत. तर आतां अखेरीस "आतां आहे तैसा दीसतो वीचार। पुढील प्रकार देव जाणे" हा तुकोबाचा गंभीर अभंग दाखल केला कीं ही धर्माची कथा संपली.

"मान्यान् प्रणम्य विहितांजलिरेष भूयो
भूयो निवेद्य विनयं विनिवेदयामि
दूष्यं वचो मम, परं निपुणं विभाव्य;
भावावबोधविहितो न दुनोति दोषः."

---

**हा निबंध ज्या शनवारीं आक्वर्थ साहेब आगबोटींतून विलायतेस निघाले, त्याच शनवारीं संध्याकाळीं "आर्यसमाजा"च्या जागेंत "ब्राह्मणसभे"च्या आश्रयाखालीं वाचण्यांत आला.**